



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ९७ * नांदेड * सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं ९२ व्या वर्षी निधन

## आज सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार



**मुंबई (प्रतिनिधी)** – ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले आहे. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात रविवारी दुपारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना शनिवारी संध्याकाळी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

ब्रीच कँडी रुग्णालयाचे डॉ. प्रतीक समदानी यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, आशा भोसले यांना अनेक वैद्यकीय समस्या होत्या आणि मल्टी-ऑर्गन फेल्युअरमुळे त्यांचे निधन झाले. डॉ. प्रतीक समदानी यांनी पीटीआयला सांगितले की, आशा भोसले यांना मल्टी-ऑर्गन फेल्युअरचा त्रास होता, म्हणजेच त्यांचे अनेक अवयव निकामी झाले होते. आशा भोसले यांचे पुत्र, आनंद भोसले यांनी सांगितले की, ज्यांना अंत्यदर्शन घ्यायचे आहे ते उद्या सकाळी ११ वाजता त्यांच्या घरी येऊ शकतात. उद्या दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क येथे अंत्यविधी होणार आहे.

### सूरसम्राज्ञी आशा ताईंना 'वानखेडे'वर श्रद्धांजली

आशा ताईंच्या स्मृतीप्रित्यर्थ आजच्या सामन्यात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मुंबई इंडियन्सचे सर्व खेळाडू आशा भोसले यांना श्रद्धांजली म्हणून हाताला काळी पट्टी बांधून मैदानात उतरले आहेत. तर सामना सुरू होण्यापूर्वी दोन्ही संघांचे खेळाडू, पंच आणि उपस्थित प्रेक्षकांनी एक मिनिटाचे मौन पाळून त्यांना आदरांजली वाहिली. मौन पाळल्यानंतर संपूर्ण स्टेडियममधील चाहत्यांनी टाळ्या वाजवून या महान गायिकेच्या योगदानाचे स्मरण केले.

## आशाताईंची नांदेड भेटीची इच्छा अपूर्णच राहिली!



### खा. अशोकराव चव्हाण यांनी दिला आठवणींना उजाळा

मला नांदेडला यायचं आहे, गुरुद्वारात दर्शन घ्यायचे आहे. आपण लवकरच कार्यक्रम ठरवूया, असा शब्द देणाऱ्या स्वरसम्राज्ञी आशाताई भोसले यांची नांदेड भेटीची इच्छा अखेर अपूर्णच राहिली. त्यांच्या निधनामुळे संगीत विश्वाचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे, अशा शब्दांत राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

आशाताईंच्या निधनानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना खा. चव्हाण यांनी त्यांच्याशी असलेल्या स्नेहबंधांना उजाळा दिला. ९० च्या दशकात आशाताई नांदेडला आल्या होत्या. त्यानंतर पुन्हा एकदा सचखंड गुरुद्वारात दर्शनासाठी येण्याची त्यांची तीव्र इच्छा होती, असेही त्यांनी नमूद केले. खा. चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये एका खास प्रसंगाचा उल्लेख केला आहे. कोरोना काळानंतर आमचे एक स्नेही प्रसाद महाडकर यांचा फोन आला आणि त्यांनी आशाताईंशी बोलणे करून दिले. त्यांनी नांदेडला येण्याची इच्छा बोलून दाखवली. मी देखील आनंदाने त्यांना निमंत्रण दिले, मात्र नियतीला हे मान्य नव्हते आणि तो योग कधीच जुळून आला नाही, अशी हळहळ त्यांनी व्यक्त केली.

नांदेडच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकणाऱ्या 'संगीत शंकर दरबार' या प्रतिष्ठित कार्यक्रमासाठी देखील आशाताईंना निमंत्रित केले होते. नांदेडकरांना त्यांचे जादुई सूर प्रत्यक्ष ऐकता यावेत, अशी माझी इच्छा होती. परंतु, त्यावेळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे आशाताईंना येता आले नाही. त्यांच्या निधनामुळे ही संधी आता कायमचीच हुकल्याची सल खा. चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केली आहे.

# आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घ्या अन्यथा मोठे आंदोलन उभे करू -मनोज जरांगे



**मुंबई (प्रतिनिधी)** – सर्व गुन्हे मागे घेतले जातील, अशा शब्द सरकारने दिला होता. जोपर्यंत सर्व गुन्हे मागे घेतले जाणार नाहीत, तोपर्यंत मी शांत बसणार नाही. सरकारने तसा शब्द दिलेला आहे. नाहीतर सर्वात मोठं आंदोलन उभं करुन सर्व गुन्हे मागे घेण्यास भाग पाडू, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. दाखल गुन्ह्या पैकी ६० ते ६२ गुन्हे न्याय प्रविष्ट आहेत. त्याबाबद सरकारने अहवाल देऊन हे गुन्ह मागे घ्यायला हवेत. ८० गुन्हे असे आहेत त्याबाबत विभागीय समितीने अहवाल देऊन हे गुन्हे मागे घ्यायल हवेत असे जरांगे म्हणाले.

सरकार आणि फडणवीस जरी त्यांनी दिलेल्या शब्दापासून बदलले असले तरी त्यांना मी बदलू देणार नाही. कसे गुन्हे मागे घेत नाही मी बघतो, मी खंबीर आहे असे जरांगे म्हणाले. गुन्हे मागे घेण्याबाबद विभागीय समितीचा आव्हाल आजून सरकारला गेलेला नाही तो अहवाल गेला की सगळे गुन्हे सरकार मागे घेईल. असे ते म्हणाले. जी उप समिती मराठ्यांची स्थापन झालीय त्यांनी मराठ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला हवं, त्यांनी दिखावा करण्यासाठी थातुर मातूर बैठका घेऊ नयेत. मराठा समाजाला उप समितीच्या अध्यक्षकडून अपमानास्पद वागणूक चालू आहे, ती थांबली पाहिजे, असे म्हणत मनोज जरांगे यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर निशाणा साधला. त्यांना समज पाहिजे की मराठा समाजाला न्याय मिळवून दिला पाहिजे. मराठे मराठ्यांच्या अंगावर घालण्यासाठी उप समिती नाही. त्याचा अध्यक्ष त्यासाठी नाही, तुमचा माज जिरवण्यासाठी उप समिती नाही, तुमचा माज जिरवायला ही समिती नाही, असे म्हणत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी जोरदार हल्लाबोल केला.

तुमची मस्ती मराठ्यांच्या डोक्यात घालायची आणि मराठ्यांच्या विरोधात मराठ्यांची झुंज लावायची. यासाठी उप समिती नसते. एललल च्या विद्यार्थ्यांचं काय? सारथीच्या विद्यार्थ्यांचं काय? आरोग्य विभागातील विद्यार्थ्यांचं काय? यासाठी उप समिती असते असे जरांगे म्हणाले. आम्हला वाटलं होतं १०० टक्के मराठ्यांच्या विद्यार्थ्यांना न्याय मिळेल. मात्र उप समितीच्या अध्यक्षांनी उलट उफनायला सुरुवात केली आहे. मराठे मराठ्यांच्या अंगावर घालवण्याची चळवळ त्यांनी सुरू केली आहे. त्यांना मराठ्यांचे प्रश्न सोडवायचे नाहीत असे म्हणत जरांगेंनी राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर टीका केली.

# इस्लामाबादेतील अमेरीका-इराणची चर्चा फिस्कटली; संघर्ष अटळ?



**इस्लामाबाद (वृत्तसंस्था)** – अमेरिका-इस्रायलने इराणविरोधात सुरू केलेल्या युद्धात ४० दिवसानंतर शस्त्रसंधी लागू झाली. मात्र, आता पुन्हा युद्धाचा भडका उडण्याची शक्यता आहे. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेली २१ तासांची प्रदीर्घ चर्चा अखेर निष्फळ ठरली आहे. अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या चर्चेतून कोणताही ठोस तोडगा निघू शकला नाही, त्यामुळे जागतिक राजकारणात पुन्हा एकदा अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

अमेरिकेचे उपाध्यक्ष जे.डी. वेंस यांनी इस्लामाबादेत पत्रकार परिषद घेऊन यासंदर्भातील माहिती दिली. वेंस म्हणाले की, आम्ही अत्यंत खुल्या मनाने आणि सकारात्मक चर्चेच्या आशेने येथे आलो होतो. मात्र, कोणतीही तडजोड किंवा करार न होताच आम्हाला रिकाम्या हाताने अमेरिकेला परत जावे लागत आहे. वेंस यांनी स्पष्ट केले की, अमेरिकेने आपल्या बाजूने इराणसमोर 'अंतिम आणि सर्वोत्तम ऑफर' ठेवली होती. मात्र, इराणने अमेरिकेच्या अटी स्वीकारण्यास सध्या स्पष्ट नकार दिला आहे. चर्चेदरम्यान अमेरिकेने आपल्या 'रेड लाइन्स' म्हणजेच मर्यादा स्पष्ट केल्या होत्या. आम्ही कोणत्या गोष्टींवर तडजोड करू शकतो किंवा कोणत्या गोष्टींवर नाही, हे इराणला स्पष्टपणे सांगण्यात आले होते. परंतु, इराणच्या प्रतिनिधी मंडळाने आमच्या अटी नाकारण्याचा मार्ग निवडला, असेही वेंस यांनी कडक शब्दांत सुनावले.

### शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण

# 'एसआयटी'च्या रडारवर छत्रपती संभाजीनगर विभाग

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – राज्यभर गाजत असलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याचे लोण छत्रपती संभाजीनगरमध्येही पोहोचले आहे. खोट्या कागदपत्रांच्या आधारे दिलेल्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी, तुकडीला मान्यता नसतानाही संचमान्यता देत नव्याने शिक्षक भरती केल्याचे विविध कागदपत्रांवरून समोर आले आहे. त्यात विशेष म्हणजे अनेक वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडीचे जावक क्रमांक शिक्षण विभागाच्या दप्तरी जुळत नसल्याचे समोर आले आहे. सुमारे ४ हजार मान्यतांची एसआयटीकडून चौकशी सुरू आहे.

सन २०१२ ते २०२५ या दरम्यानच्या कालावधीतील वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी, विनाअनुदानितवरून अनुदानावर बदली, शिक्षकेतरहून शिक्षक पदावर पदोन्नती दिलेल्या संचिकांची तपासणी एसआयटी करत आहे. २०२१ पूर्वी नवीन विनाअनुदानित शाळा, नवीन तुकड्या असलेल्या संस्थाचालकांनी अनुदान मिळण्याची आशाच सोडून दिली होती. त्यामुळे बहुतांश संस्थाचालकांनी संचमान्यता करून घेतल्या नव्हत्या. मात्र, २०२१ मध्ये

## 'युपीआय'द्वारे पेमेंटसाठी आता एक तास लागणार


**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – डिजिटल व्यवहार झपाट्याने वाढत असताना ऑनलाइन फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. यावर लगाम घालण्यासाठी रिझर्व्ह बँके ऑफ आता 'युपीआय' आणि 'आयएमपीएस' व्यवहारांबाबत महत्त्वाचा बदल करण्याच्या तयारीत आहे. या नव्या प्रस्तावानुसार, १० हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेचा व्यवहार केल्यास पैसे लगेच समोरच्या खात्यात जमा होणार नाहीत. या नियमांनुसार, १०,००० रुपयांपेक्षा जास्त ट्रान्सफरवर 'कूलिंग ऑफ पीरियड' लागू केला जाणार आहे. म्हणजेच व्यवहार पूर्ण होण्यासाठी सुमारे एक तास लागेल.

# खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत आज शिवसेनेची बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेची संघटनात्मक बांधणी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याच अनुषंगाने आज दि. १३ एप्रिल रोजी शिवसेनेचे संसदीय गटनेते खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत नांदेडमध्ये नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.

दुपारी तीन वाजता ब्लेसिंग्स बँक्वेट हॉल भारत ई-स्केअर च्या खाली कॅनॉल रोड नांदेड येथे पार पडणाऱ्या या बैठकीस राज्याचे मंत्री उदय सामंत, मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री संजय शिरसाट, अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुन खोतकर, आ. संतोष बांगर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या बैठकीस नांदेड जिल्ह्यातील शिवसेनेच्या सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधींनी, सर्व आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी, शिवसेनेच्या सर्व शाखांचे प्रमुख आणि सर्व आजी - माजी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नामदार हेमंतभाऊ पाटील, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव पाटील बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी केले असून बैठकीच्या यशस्वीतेसाठी जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, जिल्हाप्रमुख विविध देशमुख हे परिश्रम घेत आहेत.




# 'ई-केवायसी' साठी शरीरसुखाची मागणी

## लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलेची तक्रार

**जळगाव (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात चर्चेत असलेल्या लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी करण्यासाठी महिलांकडे शरीरसुखाची मागणी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लाडकी बहीण योजनेच्या ईकेवायसीच्या नावाखाली अशी मागणी करण्यात येत असल्याचे समोर आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.

जळगावात लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीच्या बहाण्याने एका नराधमाने महिलेकडे शरीरसुखाची मागणी केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. आरोपी रमेश चव्हाण याने योजनेसाठी लागणारी कागदपत्रे गोळा करण्याच्या नावाखाली पीडित महिलेचे घर गाठले आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून देण्याच्या बदल्यात तिच्याकडे शरीरसंबंध ठेवण्याची मागणी केली. या धक्कादायक मागणीमुळे हादरून गेलेल्या महिलेने अजिबात वेळ न घालवता थेट पोलिस ठाणे गाठले आणि या विकृत प्रवृत्तीविरुद्ध तक्रार नोंदवली. या प्रकरणाच्या तपासादरम्यान चव्हाण याने अन्य एका महिलेशीही गैरवर्तन केल्याचे उघड झाले आहे. त्याने निवृत्ती वेतन पुन्हा सुरू करून देण्याचे आमिष दाखवून त्या महिलेकडे शरीरसुखाची मागणी केली होती. शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली महिलांच्या असहायतेचा गैरफायदा घेणाऱ्या या आरोपीविरोधात जळगाव शहर पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

## वारकरी : सामाजिक ऐक्याचा आधारस्तंभ

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा कणा मानला जातो. संत परंपरेतून उगम पावलेला हा संप्रदाय समता, बंधुता आणि सर्व-समावेशकतेचा संदेश देणारा आहे. मात्र अलीकडील काळात या पवित्र परंपरेत काही विकृत प्रवाह शिरत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केलेले मत या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचे असून, ते वादग्रस्तही ठरले आहे. एका साहित्यिक स्मरणिकेत दिलेल्या मुलाखतीत पवार यांनी वारकरी संप्रदायात प्रतिक्रियावादी विचारधारेची घुसखोरी होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या मते, समतेचा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देणाऱ्या या परंपरेत काही कट्टर प्रवृत्तींचे अस्तित्व वाढत आहे, जे दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते. विशेषतः कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून काही लोक समाजात विभाजन निर्माण करणारे विचार मांडत असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. पवार यांचे हे विधान केवळ राजकीय प्रतिक्रिया म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. वारकरी परंपरेची मुळे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम यांसारख्या संतांनी रोवली. म्हणूनच 'ज्ञानदेवे रचिला पाया...तुका झालासे कळस', असे संतांनीच म्हटले आहे. या संतांनी कधीही जात, पंथ किंवा धर्म यांच्या आधारावर भेदभाव मान्य केला नाही. वसुधैव कुटुंबकम् या तत्त्वावर चालणारा वारकरी संप्रदाय हा समाजाला एकत्र आणणारा शक्तीस्तंभ राहिला आहे. वारकरी संप्रदायातील लोक भेटल्यानंतर एकमेकांच्या पाया पडतात. त्या ठिकाणी जात, वय आणि लिंग याचा भेद नसतो, पण याची जाणीव प्रतिगामी कट्टरवादी लोकांना नाही, असे पवार सुचवित आहेत. आज काही ठिकाणी या वारकरी संप्रदायाच्या परंपरेच्या नावाखाली समाजात भेद निर्माण करणारे विचार पुढे येत असल्याचे चित्र दिसत आहेत. दूरचित्रवाणी, युट्यूब यांसारख्या समाज माध्यम ाचा गैरवापर करून जनतेमध्ये पुन्हा अंधविश्वास रुजवण्याचा प्रयत्न होतो आहे. काही प्रवचनकार किंवा कीर्तनकार आपली वैयक्तिक किंवा राजकीय विचारसरणी लोकांवर लादण्याचा प्रयत्न करीत असल्याचा त्यांचा आक्षेप दिसतोय. कारण वारकरी संप्रदाय हा केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक चळवळही आहे. यामध्ये केवळ हिंदूच नव्हे तर इतर धर्मातील संत देखील झाले आहेत. या चळवळीचे मूळ उद्दिष्ट म्हणजे समाजाचे प्रबोधन आणि नैतिक मूल्यांची जपणूक करणे होय. पवार यांनी म्हटल्याप्रमाणे, जर या संप्रदायात प्रतिगामीवादी शक्तींची घुसखोरी वाढत असेल, तर त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. समाजाचे प्रबोधन करण्याऐवजी काही लोक समाजाचे विघटन करण्याचे काम करत असतील, तर त्याला वेळीच आळा घालणे आवश्यक आहे. अन्यथा शतकानुशतके टिकून असलेली ही समतेची परंपरा कम कुवत होण्याचा धोका निर्माण होईल. तसेच सामाजिक असमतेविरुद्ध लढा देऊन आपले आयुष्य त्यासाठी खर्ची घातलेल्या संतांचे परिश्रम व्यर्थ जातील. आजच्या काळात सामाजिक माध्यमे आणि सार्वजनिक व्यासपीठांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशा परिस्थितीत चुकीच्या विचारांचा प्रसार अधिक वेगाने होतो. त्याम ुळे वारकरी संप्रदायातील जबाबदार व्यक्तींनी आणि समाजातील जागरूक नागरिकांनी याबाबत सजग राहणे गरजेचे आहे. कीर्तन आणि प्रवचन हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, परंतु त्याचा गैरवापर होऊ नये याची दक्षता घ्यावी लागेल. या पार्श्वभूमीवर पवार यांनी काही कीर्तनकार आणि प्रवचनकारांची यादी तयार करण्यास सुरुवात केल्याचे सांगितले आहे. यामागील उद्देश हा कोणत्याही व्यक्तीला लक्ष्य करणे नसून, संप्रदायातील शुद्धता आणि मूळ मूल्यांचे संरक्षण करणे हा आहे, असे म्हणता येईल. ही भूमिका समाजहिताची आहे आणि त्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. वारकरी संप्रदायाची ताकद ही त्याच्या सर्वसमावेशकतेत आहे. येथे कोणत्याही प्रकारचा भेदभाव मान्य नाही. त्यामुळे या परंपरेला कमजोर करणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीला थारा देणे योग्य ठरणार नाही. संतांच्या शिकवणीप्रमाणे प्रेम, करुणा आणि समतेचा मार्ग स्वीकारणे हीच खरी वारकरी परंपरा आहे. समाजाला एकत्र ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. धार्मिक किंवा सांस्कृतिक चळवळींचा वापर करून समाजात फुट पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना ओळखून त्यांना रोखणे ही काळाची गरज आहे. पवार यांनी व्यक्त केलेली चिंता योग्य की अयोग्य हा मुद्दा बाजूला ठेवला तरी वारकरी संप्रदाय हा केवळ श्रद्धेचा विषय नाही, तर तो सामाजिक ऐक्याचा आधारस्तंभ आहे आणि तो अबाधित राखणे ही काळाची गरज आहे आणि हीच खरी समाजसेवा ठरेल.

# भारतीय गायन क्षेत्रातील तेजस्वी तारा आशा भोसले



भारतीय चित्रपट संगीताच्या क्षेत्रात आपल्या चिरतरुण अशा जादुई आवाजाने संपूर्ण जगाला मंत्रमुग्ध करणाऱ्या महान गायिका आशा भोसले यांचे निधन झाले असून ही संपूर्ण भारतीय चित्रपट क्षेत्राची कधीही न भरून निघणारी हानी होय. त्यांच्या जाण्याने एक युग संपले, एक स्वर थांबला, पण त्यांनी गायलेली अजरामर गाणी सदैव जिवंत राहतील.

भारतीय चित्रपटसृष्टीमध्ये गायन क्षेत्रात जी काही अजरामर व्यक्तिमत्व होऊन गेले त्यामध्ये स्वर कोकिळा, गानसम्राज्ञी लता मंगेशकर, किशोर कुमार, मुकेश, मोहम्मद रफी, आशा भोसले, महेंद्र कपूर, येसूदास, मन्नाडे यांचा उल्लेख करावा लागतो. या सर्व दिग्गज गायकांम ध्ये एक जिंदादिल आवाज ज्यांचा होता ते व्यक्तिमत्व म्हणजे आशा भोसले.

गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांची लहान बहीण असलेल्या आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली येथे झाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे प्रख्यात शास्त्रीय गायक आणि नाट्य संगीतकार होते. त्यामुळे घरातच संगीताचे वातावरण व संस्कार मिळाल्यामुळे लहानपणा-पासूनच त्यांना सुरांची ओळख झाली. मंगेशकर कुटुंबातील लता, आशा उषा, मीना व हृदयनाथ मंगेशकर या भावंडांनी आयुष्यभर संगीताची साधना केली. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी त्यांनी 'माझा बाळ' या चित्रपटातून गायन क्षेत्रात पदार्पण केले. त्या काळात चित्रपटसंगीतावर लता मंगेशकर, शमशाद बेगम, गीता दत्त यांचा दबदबा होता. अशा परिस्थितीत स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे हे अत्यंत कठीण होते. पण आशाताईंनी कधीही हार मानली नाही व अतिशय जिद्दीने स्वतःचं अस्तित्व निर्माण केलं. आशा भोसले या स्वतःच संगीताची व गायनाची जणू काही एक शाळाच होत्या. गायनामध्ये वेगवेगळे प्रयोग करणे हा त्यांचा स्वभाव होता.

आशा भोसले यांच्या जीवनात अनेक चढता आली. आयुष्यात येणाऱ्या अडचणी, वैयक्तिक संकटे, जबाबदाऱ्या या सर्वांशी संघर्ष करत त्यांनी एक स्वतःचा मार्ग तयार केला. संघर्ष हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग होता, पण त्यातूनच त्यांची जिद्द आणि आत्मविश्वास अधिक बळकट झाला. लता मंगेशकर व आशा भोसले या दोघीही अतिशय महान गायिका पण दोघांच्याही गायनामध्ये खूप फरक दिसतो. अतिशय परखड व स्पष्ट वक्तृया असणाऱ्या आशा भोसले अतिशय मिश्किल तथा हजरजबाबी होत्या. त्यांनी वेगवेगळ्या प्रकारची गाणी गायली. मराठी, हिंदी, गुजराती, तेलगू, असामी, इंग्रजी अशा वेगवेगळ्या २० भाषांमधून ९०० पेक्षा जास्त चित्रपटातून जवळपास १५००० गाणी त्यांनी गायलेली आहेत. त्यांनी एक-दोन चित्रपटां-मध्ये काम सुद्धा केलेले आहे. हिंदी चित्रपट सृष्टीतील मीनाकुमारी, मधुबाला, नूतन-पासून ते उर्मिला मार्तोंडकरपर्यंत त्यांनी आ-पला स्वर दिलेला आहे. वयाच्या ९० व्या वर्षी दुबई येथे जाऊनही त्यांनी गायनाचा कार्यक्रम उभा राहून पूर्ण केला हे त्यांचं वैशिष्ट्य होय. १९५७-५८ च्या सुमारास त्यांना एस. डी. बर्मन यांच्याकडे गाण्याची संधी मिळाली आणि तेथून त्यांच्या कारकिर्दीला नवे वळण मिळाले. चलती का नाम गाडी, सुजाता, कालाबाजार, नौ दो ग्यारह यांसारख्या चित्रपटांमधील गाण्यांनी त्यांना खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळवून दिली. आशा भोसले यांच्या आवाजात विलक्षण लवचिकता होती. त्यांचा आवाज बहुरंगी होता. शास्त्रीय गायनापासून गझल, लावणी, भजन, पॉप, कॅबरे, डिस्को सर्व प्रकारच्या गाण्यांमध्ये त्यांनी स्वतः ची छाप सोडली. ओ. पी. नय्यर यांच्यासोबतची त्यांची जोडी अफलातून ठरली. आइये मेहरबाँ, जाइये आप कहाँ, वो हसीन दर्द दे यांसारखी गाणी आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. त्यानंतर आर डी बर्मन यांच्यासोबत त्यांनी नव्या संगीतशैलीचा प्रयोग केला. पिया तू अब तो आजा, दम मारो दम, जाने जा यांसारख्या गाण्यांनी तरुणाईला वेड लावले. १९८१ साली उमराव जान या चित्रपटातून त्यांच्या गझल गायकीचा नवा पैलू समोर आला. इन आखो की मस्ती के,दिल चीज क्या है ही गाणी आजही सर्वत्र ऐकली व गायली जातात.

आशाताईंनी किशोर कुमार, मोहम्मद रफी, मुकेश यांसारख्या महान गायकांसोबत अनेक अजरामर गाणी दिली. त्या काळातील लता-आशा-किशोर-रफी-मुकेशम्हणजे भारतीय चित्रपट संगीतातील सुवर्णयुग होते. हिंदीप्रमाणेच मराठी संगीत विश्वातही त्यांचे योगदान अनमोल आहे. सांज ये गोकुळी, जिवलगा राहिले रे दूर, फुलले रे क्षण माझे, केव्हा तरी पहाटेसांज ये गोकुळी, उषःकाल होता होता, नाच रे मोरा, रुपेरी वाळूत, मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश, गोम संगतीने, मी कात टाकली, मी मज हरपून बसले ग, यांसारखी गाणी आजही मनाला स्पर्श करतात. त्यांनी सुरेश वाडकर, सुधीर फडके यांसारख्या अनेक गायकांसोबत काम केले.

आशा भोसले यांनी केवळ भारतातच नव्हे तर जगभरात आपली ओळख निर्माण केली. कॅनडा, अमेरिका, इंग्लंड यांसारख्या देशांत त्यांनी कार्यक्रम केले. विविध परदेशी संगीतकारांसोबतही त्यांनी प्रयोग केले.त्यांचा आशा अँड फ्रेंड्स हा अल्बम प्रसिद्ध झाला ज्यात ब्रेट ली आणि संजय दत्त यांच्यासोबत त्यांनी गाणे गायले आहे, हा त्यांच्या प्रयोगशीलतेचा उत्कृष्ट नमुना आहे. किशोर कुमार हे त्यांचे अतिशय आवडते गायक होते. त्यांची मोठी बहीण असलेल्या लता मंगेशकर यांना त्या जगातील सर्वोत्कृष्ट गायिका मानत. त्यांच्या संगीत क्षेत्रातील अलौकिक अशा क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्याम ध्ये पद्मविभूषण, अनेक राष्ट्रीय पुरस्कार, लता मंगेशकर पुरस्कार,फिल्मफेअर पुरस्कार आणि चित्रपट क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा दादासाहेब फाळके पुरस्कार हा सन्मान त्यांना मिळाला.

एक बहुआयामी व्यक्तित्व असलेल्या आशाताई केवळ गायिका नव्हत्या, तर त्या एक जिंदादिल, हसतमुख आणि जमिनीवर पाय असलेली व्यक्ती होत्या. गाणं सोबतच खाण्याची व खाऊ घालण्याची त्यांना खूप आवड होती. स्वयंपाकाची त्यांना विशेष आवड होती. त्यांच्या आयुष्यात दुःखाचे अनेक प्रसंगही आले, पण त्यांनी कधीही हार मानली नाही. त्या नेहमी म्हणत, संगीत माझा श्वास आहे, संगीत माझं दैवत आहे. माझ्या नावातच आशा असून मी सदैव आशावादी आहे व माणसाने नेहमी आशावादी राहिले पाहिजे असं त्या नेहमी सांगत.

अशा या महान गायिकेने वयाच्या ९२ व्या वर्षी १२ एप्रिल २०२६ रोजी हृदयविकाराने अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधना-ने भारतीय संगीतसृष्टी पोरकी झाली आहे. आशा भोसले यांचे आयुष्य म्हणजे संघर्ष, जिद्द, प्रयोगशीलता आणि प्रतिभेचा अद्भूत संगम होता. त्यांनी हजारो गाण्यांमधून प्रत्येक भावनेला आवाज दिला आहे. प्रेम, विरह, आनंद, वेदना, भक्ती, उत्साह त्यांच्या आवाजात होता. त्यांच्या आवाजात एक जादू होती जी पिढ्यानपिढ्या लोकांना भुरळ घालत राहील. आज त्या आपल्यात नसल्या तरी त्यांचे गाणे प्रत्येक क्षणी आपल्या सोबत आहे. अशा ह्या जगप्रसिद्ध महान गायिकेला विनम्र अभिवादन.

**-प्रा. डॉ. विजय भोसले,**
यशवंत महाविद्यालय, नांदेड,
मो. ९४०३०६७२५२

# मेलडी क्वीन आशाताई काळाच्या पडद्याआड



गेली सात दशके आपल्या जादुई स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहा-सनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचे रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वावरच नाही तर संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. आशाताईंच्या निधनाने केवळ संगीत विश्वाचीच नाही तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने संगीत विश्वाला वाहून घेतलेला आणि आपल्या जादुई स्वरांनी संपूर्ण संगीत विश्वावर अधिराज्य गाजवणारा शेवटचा तारा निखळला. भारतीय संगीत विश्व ज्यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही अशा मोजक्या कलाकारांत त्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल.

८ सप्टेंबर रोजीच आशाताईंचा ९२ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी त्यांचा उत्साह पाहता त्या वयाची शंभरी पार करतील असेच वाटत होते, पण नियतीला हे मान्य नव्हते असेच म्हणावे लागेल. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांनी ३ तासांचा संगीत कार्यक्रम केला होता असे कोणाला सांगितले तर त्यावर विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये वयाच्या नव्वदीतही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा होती. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी होती की, त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. तीन वर्षापूर्वी २४ मार्च २०२३ रोजी आशाताईंना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले होते. तेव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता. यावेळी तेव्हाचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेले अनेक पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला.

१९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है हे गाणे गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला. या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली.

१९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आज थांबला. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

२००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरुवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही.

आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही गायली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. त्यांच्या निधनाने संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणारी मेलडी क्वीन काळाच्या पडद्याआड गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मेलडी क्वीन आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# जीवन सफलतेसाठी सत्संगत आवश्यक



लोककवी तुकोबाराय म्हणजे सहज बोलत बोलत समाजाच्या सर्वांगीण हिताचा विचार करून उपदेश करणारे सामान्यातून सर्वमान्य झालेले असामान्य व्यक्तिमत्व! लोकांचा लोकधर्म जवळून निरखणारे तुकोबा म्हणजे महान समाजसुधारक! कोणत्याही शस्त्र-अस्त्राविना समाजाच्या सर्वांगाचे पोस्टमार्टेम करून सडेतोड विश्लेषण करणारे अलौकिक रसायन, शास्त्रज्ञ म्हणजे संत तुकाराम! त्यांचे अभंग वाड्.मय ही एक विशालकाय वास्तू असून दैनंदिन समाज व्यवहाराचे चिंतन-मंथन याच वास्तुद्वारे तुकोबांकडून सदोदित होत आले आहे. सर्वसामान्य माणसांचे जगणे आडमार्गाने जात असताना संत-वचने योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य करताना वाटेतील भेदाचे आणि अज्ञानाचे काटे बाजूला सारण्याचे काम सर्वच संतांनी केले आहे. देव-ईश्वर आदी संकल्पना स्पष्ट करताना तुकोबा त्यांच्याशी सरळ संवाद साधताना दिसतात. त्यांचे लेखन-प्रबोधन हे दैनंदिन जीवन आणि व्यवहार याचा परस्पर संबंधाचा मेळ बसवून आपले प्रबोधन-बीज समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे महत्कार्य तुकोबा सहजतेने करतांना दिसतात. अगदी याच प्रकारे संत कबीरजी आपल्या दोह्यामधून प्रबोधन करतांना लोकांना सहजच उपदेश करतात.

जहाँ दया तहा धर्म है, जहाँ लोभ वहां पाप।
जहाँ क्रोध तहा काल है, जहाँ क्षमा वहां आप।

असे दोहे लिहून समाजाला खरी ईश्वरानुभूती करून देण्याचं काम संतांनी केलं. धर्म आणि तत्ससंबंधी विचार प्रकट करतांना कबीरांनी दया-क्षमा आणि राग-लोभ याचा पाप-पुण्य या दोन संकल्पना स्पष्ट करून लोकांना उपदेश केला आहे. अगदी याच अनुषंगाने समाजातील माणसांचा दैनंदिन लोकव्यवहार कसा स्वार्थी आणि संकुचित आहे याचे सुंदर विवेचन तुकोबाराय या अभंगातून करतात.

ऐसा हा लौकिक कदा राखवेना ।
पतितपावना देवराया ।।१।।
संसार करितां म्हणती हा दोषी ।
टाकितां आळसी पोटपोसा ।।ध्रु.।।
आचार करितां म्हणती हा पसारा ।
न करितां नरा निंदिताती ।।२।।
संतसंग करितां म्हणती हा उपदेशी ।
येरा अभाग्यासि ज्ञान नाहीं ।।३।।
धन नाहीं त्यासि ठायींचा करंटा ।
समर्थासि ताठा लाविताती ।।४।।
बहु बोलों जातां म्हणति हा वाचाळ ।
न बोलतां सकळ म्हणती गर्वी ।।५।।
भेटिसि न वजातां म्हणती हा निष्ठुर ।
येतां जातां घर बुडविलें ।।६।।
लग्न करूं जातां म्हणती हा मातला ।
न करितां जाला नपुंसक ।।७।।
निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ ।
पातकाचें मूळ पोरवडा ।।८।।
लोक जैसा ओक धरितां धरवेना ।
अभक्ता जिरे ना संतसंग ।।९।।
तुका म्हणे आतां ऐकावें वचन ।
त्यजुनियां जन भक्ति करा ।।१०।।
(शा.अ.गाथा अ.क्र. २५९)

लोकमत आणि त्याचे विविध पैलू तुकोबांच्या या अभंगातून स्पष्ट होतात. समाजाचे दुटप्पी व्यवहार तुकोबा या अभंगातून सांगतांना त्यांना आलेले अनुभवच त्यांनी या अभंगाद्वारा विशद केले आहेत. समाजाने आतापर्यंत कोणत्याच माणसाला दुषणे दिल्याशिवाय सोडले नाही. तुकोबाराय लौकीकाविषयी या अभंगामध्ये मोठ्या सहजतेने लिहून अपना सर्वांना जागृत करून लोकधर्म विशद करतात. लोकव्यवहार मोठा विचित्र असून कोणतीच गोष्ट समाज माणसाला करू देत नाही. संसार करणाऱ्या माणसाला हा कोशात अडलेला किडा आहे, आणि जर त्याने संसार केला नाही तर त्याला हा निव्वळ भुईला भार आहे असे म्हणतात. एखाद्याने धर्माचे व्यवस्थित आचरण केल्यास याने पसारा वाढवला आहे म्हण-तात, तर कोणतेच आचरण केले नाही तर हा आचरणभ्रष्ट आहे असे म्हणून समाज हिणवत राहतो. एखादा संतांच्या संगतीने राहिला तर हा उपदेशी आहे, आणि संतसंग केला नाही तर मूर्ख आहे अशी दुषणे लावतील. लोक गरिबाला कपाळ करंटा तर श्रीमंताला अहंकारी म्हणून संबोधतात. एखादा माणूस बोलका आहे म्हणून त्याला बडबड्या म्हणतील, तर एखादा मितभाषी असेल त्याला गर्विष्ठ म्हणून बोलावतील. एखादा माणूस नातेवाईकांच्या भेटीला गेला नाही तर निष्ठुर म्हणतील आणि वारंवार जायला लागला तर येता-जाता घर बुडव्या म्हणून चिडवतील. एखाद्याने लग्न केले तर माजला म्हणतील आणि नाही केले तर नपुंसक म्हणून त्याला दोष देतील. एखाद्याला मुलं-बाळ नसेल तर निपुत्रिक म्हणतील, जास्त मुले असतील तर पोरवडा वाढवून ठेवला म्हणतील. हा सगळा लोक व्यवहार पाहून तुकोबाराय व्यथित होतात आणि या सर्व लोकव्यवहाराला 'ओकारी' ची उपमा देतात, ज्याप्रमाणे माणसाला आलेली उलटी थांबवून ठेवता येत नाही त्याप्रमाणे लोकव्यवहार रोखून किंवा थांबवून जीवन जगणे कुणालाही शक्य नाही, तसा अभक्त माणसाला संतसंग सहन होत नाही. तेंव्हा यावर सरळ-सोपा उपाय म्हणजे 'ऐकावे जणाचे आणि करावे मनाचे' या म्हणीप्रमाणे आपण लोकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून आपल्याला योग्य वाटेल तेच करावे असा सल्ला तुकोबाराय आपणांस देतात.

प्रत्येक वाचकाने हा अभंग अत्यंत काळजीपूर्वक वाचवा, कारण आज आपण सर्व मिडीयावर वावरत आ-होत आणि त्यावेळी कोण काय प्रतिक्रिया देतो याकडे सावधपणे पाहणे गरजेचे आहे. आजसुद्धा हा अभंग आपणास तंतोतंत मार्गदर्शक ठरतो. या अभंगातून आपण मा णसांची माणसाकडे पाहण्याची नजर कशी आहे (?) हे लक्षांत येते. जीवनामध्ये कोणतीही कृती करतांना सद्सदविवेक जागृत ठेवून विचार आणि कार्य करणे गरजेचे आहे. विवेक माणसाला पथभ्रष्ट होऊ देत नाही. तेंव्हा हा अभंग वर्तमानात असो किंवा भविष्यकाळात असो, अत्यंत कळीचा आहे. सर्वत्र प्रतिक्रिया देणाऱ्या लोकांचे वारूळ उठलेले असतांना हा अभंग बुडत्याला सुकाणूचा आधार होऊन आपल्यासोबत उभा आहे. तुकोबांचा हा अभंग सर्वकाळ सोबत ठेवण्यासारखा आहे, याचे कारण म्हणजे आपण सर्वजण 'सबसे बड़ा रोग, क्या कहेंगे लोग' यामध्ये गुरफटलेलो असतांना आपल्याला सामान्य माणसांचा गुणधर्म लक्षांत घ्यावा लागेल. सामान्य माणूस कुणाविषयी काय चर्चा करतो (?) हे महत्वाचे असून त्याच अनुषंगाने हा अभंग अत्यंत महत्वाचा आहे.

आज तुकारामनीती अंतर्गत विवेचनाकरिता घेतलेला अभंग हा दहा चरणांचा असून हे दहा चरण म्हणजेच पंच ज्ञानेंद्रिये आणि पंच कामेंद्रीये यांना मार्गदर्शक आहे. संत-विचारवंत हे त्रिकालात विचार करून त्यापलीकडचे चिंतन आपल्या लेखणीद्वारे निर्माण करून ठेवत असतात. त्यांना कोणताही काळ हा बंधनात ठेवू शकत नाही. आज या विचारांची नितांत आवश्यकता असून दैनंदिन जगणे हे मोठे आवाहनात्मक झाले असतांना आपण लोकांच्या प्रतिक्रियांकडे सहजतेने पाहून, त्यांचा साधक-बाधक विचार करून जीवन व्यतीत करणे क्रमप्राप्त ठरते. आज भोवताल पाहत असतांना सर्वच गोष्टींचे स्तोम वाढले आहे. योग्य-अयोग्य याची निवड करणे कठीण होऊन बसले असतांना आपल्याला हा अभंग पथदर्शी ठरतो आहे. संत तुकोबांच्या या अभंगाकडे पहिले असता आपल्या हे लक्षात येते की; तुकोबाराय केवळ भजन-पूजन करणारे वारकरी नव्हते, तर त्यांनी आपल्या विचारांच्या फाळाने येथील जमीन भुसभुशीत करून सामान्य लोकमतांची खोलवर नांगरणी केलेली दिसून येते. माणसांचे सामान्य गुणधर्म तुकोबा सहजतेने लिहून जागृती करत गेले आणि आजही करत आहेत. त्यांच्या अभंगांचा हा अनमोल ठेवा सर्वकाळ-सर्वांना मार्गदर्शक असून आपण सर्वांनीच त्याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे आणि जीवन आनंदी करणे क्रमप्राप्त आहे.

आज सगळीकडे धर्म-जात-रंग अन् कट्टरतेचे वादळ उठले असतांना, भरकटलेल्या जीवन नौकेला तुकोबांचे अभंग होकायंत्राच्या रूपाने मार्गदर्शक ठरणारे आहेत. आजचा लोकव्यवहार त्यांच्या या अभंगातून आपल्यासमोर येत असून लोक काय प्रतिक्रिया देतात याचे अवलोकन करावे आणि नंतरच अपण त्याचा साधक-बाधक विचार करून आपल्या जीवनात ते अंगीकारावे. असे झाले की मगच खऱ्या अर्थाने या अभंगाचे सार्थक होणार आहे. नाही-तर समाजाच्या सर्वच प्रतिक्रिया गांभीर्याने घेतल्यास आपल्यावर 'गाढव नदीत फेकून पश्चाताप करणाऱ्या बापलेकासारखी' वेळ येईल आणि कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही. 'तेलही गेले, तूपही गेले आणि हाती धुपाटणे आले' अशी वेळ येऊ नये यासाठी नित्य जागृत असणे अत्यंत गरजेचे आहे. तेंव्हा चला तर मग आपण आपले वर्तन सुधारून घेऊ आणि लोकांच्या प्रतिक्रियाकडे डोळे झाकून न पाहता तसेच त्यांना आपल्या जीवनाला लावून न घेता आपले जीवन विवेक-विचाराने पूर्ण करून घेवूयात! हाच महत्वपूर्ण संदेश तुकोबा या अभंगाद्वारा देतात आणि तो आपण अंगीकारून जीवन सफलतेच्या मार्गाने पुढे घेऊन जाऊयात !

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

# सहा वर्षांच्या अंधारानंतर तिरंगी रोषणाईने लोहा शहर उजळले

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरात मागील सात वर्षांपासून मुख्य रस्त्याची लाईट बंद होती. दुकानाच्या उजेडात या रस्त्यावर वाहने व पादचारी वावरत होते. नगरपालिका निवडणूक काळात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शहरवासियांना जे आश्वासन दिले त्याची पूर्तता होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर महात्मा फुले जयंतीदिनी गेल्या सहा वर्षांचा अंधार दूर करत युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते शहरातील मुख्य रस्त्यावरील स्ट्रीटलाईन सुरू करण्यात आली. तिरंगामय उजेड शहराच्या वैभवात भर टाकणारा असून, नगराध्यक्ष शरद पवार व टीमचे जनतेने अभिनंदन केले.

लोहा शहरात गेल्या सहा वर्षांपासून मुख्य रस्त्यावरील स्ट्रीट लाईट बंद होत्या. त्यामुळे मुख्य बाजारपेठ अंधारात होती. या भागाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नगरपालिका निवडणुकीत शहरातील जनतेला स्वच्छता व पाणी या सोबत मुख्य रोडवरील लाईट बाबत आश्वासित केले होते. शरद पवार पाटील यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांना



१६ एप्रिल रोजी १०० दिवस होताहेत, या काळात अनेक विकासकामे झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शिवजयंती काळात एका बाजूने तिरंग्याने विद्युत रोषणाई करण्यात आली होती. त्यानंतर तांत्रिक अडचण दूर करत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपर्यंत मुख्य रस्ता तिरंगामय व्हावा अशा सूचना आ. प्रतापराव पाटील यांनी दिल्या होत्या. युवा नेते प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष शरद पवार व टीमने रात्री स्वतः मुख्य रस्त्यावर उभे राहून काम करून घेतले, आणि भीमजयंतीच्या पार्श्वभूमीवर शहरातील मुख्य बाजारपेठ तिरंगामय रोषणाईने उजळून निघाली.

शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतीबा फुले जयंतीदिनी माजी जिल्हा परिषद सभापती प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते स्ट्रीट लाईटचा शुभारंभ करण्यात आला आणि शहर उजेडात न्हाऊन निघाले. यावेळी माणिकराव मुकदम, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, नगरसेवक भास्कर पवार, हरिभाऊ चव्हाण, बालाजी खिल्लारे, अविनाश पवार, मारुती जंगले, सदानंद तेलंग, तुकाराम दाढेल, सतीश निखाते, राजेश बोडके यांच्यासह मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते.

# आर्थिक फसवणुकीचा असाही नवीन 'ऑनलाईन फंडा'

**नांदेड (प्रतिनिधी)** –ऑनलाईन फसवणुकीचा एक नवा प्रकार समोर आला असून, भाजपाचे नांदेड जिल्हा सरचिटणीस ॲड. दिलीप ठाकूर यांच्या सतर्कतेमुळे मोठा आर्थिक फटका बसण्यापासून बचाव झाला आहे. या घटनेमुळे नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना अधिक सावध राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

शुक्रवारी सायंकाळी ठाकूर यांना ९०३९९ ६७९५९ या अनोळखी क्रमांकावरून फोन आला. समोरची व्यक्ती हिंदीत बोलत होती. त्याने स्वतःला सीमाचा नातेवाईक असल्याचे सांगून विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला. पुढे त्याने माझा गुगल पे बंद आहे, माझा भाऊ तुमच्या नंबरवर पैसे पाठवेल, ते तुम्ही उद्या मला नगदी द्या, असे सांगून घाईत फोन कट केला.

फोन संपताच ठाकूर यांच्या मोबाईलवर राजू कुमार या नावाने ४५,५०० रुपये जमा झाल्याचा मॅसेज आला. मात्र, एवढी मोठी रक्कम पाहून ठाकूर यांना संशय आला. काही वेळातच पुन्हा फोन करून संबंधित व्यक्तीने चुकून जास्त रक्कम पाठवली गेली आहे, त्यातील २० हजार रुपये तत्काळ परत पाठवा, अशी मागणी केली. यावेळी ठाकूर यांनी अधिक चौकशी करत संबंधित व्यक्तीकडून स्पष्ट ओळख मागितली. मात्र, त्याने समाधानकारक उत्तर देण्याऐवजी भावनिक दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. गरिबाचे पैसे परत करा, नाहीतर शाप लागेल, असे सांगत घाई निर्माण केली. तरीही ठाकूर यांनी ठाम भूमिका घेतली.

यानंतर संबंधित व्यक्तीने शिवीगाळ करत धमक्या देण्यास सुरुवात केली. तू कुठे आहेस सांग, मी येतो, असे म्हणत दबाव आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, ठाकूर यांनी निर्भयपणे उत्तर देत तू येच असे स्पष्ट सांगितले. त्यानंतर त्या व्यक्तीने फोन बंद केला.

घटनेनंतर अधिक सतर्क होत ठाकूर यांनी आपल्या खात्याची तपासणी केली असता, प्रत्यक्षात कोणतीही रक्कम जमा झाली नसून केवळ बनावट मॅसेज पाठवण्यात आल्याचे उघड झाले. त्यानंतर त्यांनी पुन्हा संबंधित व्यक्तीकडे व्यवहाराचा स्क्रीनशॉट मागितला असता, त्याने हसून फोन कट करून संपर्क तोडला.

या प्रकारामुळे, भावनेच्या भरात पैसे परत पाठवण्याची घाई केली असती तर दिलीप ठाकूर यांना स्वतःच्या खात्यातून रक्कम गमवावी लागली असती, हे स्पष्ट झाले आहे. ठाकूर यांच्या सतर्कतेमुळे हा संभाव्य फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. अशा प्रकारचा फोन कॉल्स किंवा मॅसेजेसवर विश्वास ठेवू नये. कोणतीही रक्कम प्राप्त झाल्याचा दावा केल्यास प्रथम बँक खात्यातील व्यवहाराची खात्री करूनच पुढील निर्णय घ्यावा. ऑनलाईन व्यवहार करताना नागरिकांनी सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक असल्याचे आवाहन ॲड. दिलीप ठाकूर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## आ. कैलास पाटील यांनी लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आ. रोहिदास चव्हाण यांची घेतली सदिच्छा भेट



**लोहा (प्रतिनिधी)** –शिवसेना उबाठाचे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या लोहा येथील कैलास स्मृती निवासस्थानी धाराशिव-कळंब मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील यांनी नुकतीच सदिच्छा भेट घेतली.

यावेळी विविध विषयांवर चर्चा केली. या भेटीत माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी आ. कैलास पाटील यांचा यथोचित सत्कार केला.

यावेळी युवा नेते तथा सिनेट सदस्य नवनाथ ऊर्फ बापुसाहेब रोहिदास चव्हाण, सेवानिवृत्त कृषी अधिकारी विश्वांभर मंगनाळे, नगरसेवक विलास कहाळेकर, ज्येष्ठ शिवसैनिक धुराजी नावंदे, शिवसेना उपतालुका प्रमुख परमेश्वर घोरपडे, भारसवाडा तंटामुक्ती अध्यक्ष बाबाराव पाटील हालगे, पांडुरंग लोंढे, नागेश शेवडकर, अशोक केंद्रे, शिव काकडे, अभिषेक कहाळेकर आदींची उपस्थिती होती.

## महात्मा जोतीबा फुले यांची जयंती अर्धापुरात ठिकठिकाणी साजरी

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –शहरात महात्मा जोतीबा फुले यांची जयंती प्रज्ञा बौद्ध विहार, संत सावता महाराज मंदिर, नगरपंचायत कार्यालय यांसह विविध ठिकाणी शनिवार, दि.११ एप्रिल रोजी साजरी करण्यात आली.

थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा जोतीबा फुले यांना जयंतीदिनी प्रज्ञा बौद्ध विहार येथे नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनिल वानखेडे, माजी उपनगराध्यक्ष राजू शेट्टे, भाजप शहराध्यक्ष योगेश हाळदे, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सखाराम क्षीरसागर, अध्यक्ष गुणवंत विरकर, व्यंकटी राऊत, नामदेव सरोदे, मुस्वीर खतीब, माजी उपसरपंच भुजंगराव माटे, ॲड भानुदास मगरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुतळ्याचे पूजन करून हार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भीमराव सरोदे, बालाजीराव सिनगारे, गुरूराज रणखांब, ज्ञानेश्वर माटे, बाळू माटे, शेख मकसुद, महिंद्र सरोदे, शेरू पठाण, गोपाल पंडित, प्रसिद्धी प्रमुख गुणवंत सरोदे, ॲड. गौरव सरोदे, बापूजी राऊत, विष्णू राऊत, प्रकाश इंगळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

संत सावता महाराज मंदिर, भाजप कार्यालय, नगरपंचायत कार्यालय यांसह ठिकठिकाणी महात्मा जोतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

## लोहा कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



**लोहा (प्रतिनिधी)** – लोहा कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी थोर समाजसुधारक राष्ट्रपिता महात्मा जोतीबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रतिमेस लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार व सचिव ए. बी. घोरबांड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार, सचिव एस. बी. घोरबांड, छावा युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष माऊली पाटील पवार, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसचिव बालाजी भोसीकर, आडगावचे पोलीस पाटील विश्वाभंर क्षीरसागर, शरद पाटील पवार, राम पाटील काळे आदी उपस्थित होते.



**नांदेड**–येथील एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात थोर समाजसुधारक आणि स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते महात्मा जोतीराव फुले यांची १९९ वी जयंती महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात साजरी करण्यात आली. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी डॉ. गोविंद हंबर्डे, डॉ. चंदनकुमार सोमवंशी, प्रा. राहुलकुमार शर्मा, स्पोर्ट ऑफिसर मनोजकुमार राठोड यांच्यासह ज्ञानोबा शिंदे व आकाश तेलंग आदींसह विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमीत्त पिण्याचे पाणी व रक्तदान शिबिराचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रेल्वे स्थानक परिसरात आंबेडकरी अनुयायांना मोफत थंड पाणी आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा शांतता कमिटीचे सदस्य ॲड. वशीम कासिम बाबू शेठ यांनी कळविले आहे.

जिल्हाधिकारी नांदेड यांचे कलम ३७ (१) (३) मपोका अधिसूचनेचे अधिन राहून मस्जिद ए मोहम्मद युनूस, नांदेड समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीनिमीत्त धार्मिक एकतेसाठी पिण्याचे पाणी वाटप व रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे. मंगळवार, दिनांक १४ एप्रिल रोजी पिण्याचे पाणी वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामुळे कायदा व सुव्यवस्थेचा तसेच वाहतुकीचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी कोणत्याही स्वरुपाचे आक्षेपार्ह बाबींचे ध्वनीक्षेपन करण्यात येणार नाही. पिण्याचे पाणी वाटपामुळे कार्यक्रमास येणारे लोकांना, रस्त्यावरील पादचाऱ्यास वाहनास अडथळा त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात येणार. या कार्यक्रमात रक्तदात्यांनी रक्तदान करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे, असे आवाहन वसीम बाबू सेठ यांनी केले आहे.

## सिडको येथील नंदीग्राम बौद्ध विहार जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी सुमनबाई पाटील

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –



महात्मा जोतीबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रथमच नंदीग्राम बौद्ध विहार समितीच्या अध्यक्षपदी सुमनबाई पाटील यांची निवड करण्यात आली.

जयंती सोहळ्याच्या निमित्ताने ११ एपिल रोजी जोतीबा फुले यांची जयंती ते १४ एप्रिल महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नंदीग्राम

## आंबेडकरवादी मिशनमध्ये उद्या १८ तास अभ्यास उपक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीदिनी येथील आंबेडकरवादी मिशनमध्ये १४ एप्रिल रोजी सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत सलग १८ तास अभ्यास उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मागील २५ वर्षापासून आंबेडकरवादी मिशनच्या वतीने दीपक कदम यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

दरवर्षी शेकडो विद्यापीठातून लाखो विद्यार्थी ह्या उपक्रमात सहभागी होऊन प्रत्यक्ष कृतीद्वारे अभ्यासात्मक अभिवादन करीत असतात. या वर्षीसुद्धा अभ्यास उपक्रम राबविण्यात येत आहे. सर्व जाती-धर्मातील, सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन १८ तास अभ्यास करून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करावे. सहभागी विद्यार्थ्यांना निःशुल्क प्रवेश असेल. दिवसभर निःशुल्क जेवण, नाश्ता, फळे, ज्यूस, बिस्किटे आदी व्यवस्था करण्यात येईल. मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था करण्यात आली आहे, असे आंबेडकदवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी कळविले आहे.

## जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीसाठी डॉ. किशोर इंगळे यांना मतदानाचा अधिकार



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आगामी निवडणुकीसाठी महत्त्वाचा निर्णय घेत नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील सहकारी पतसंस्था मर्यादित, नांदेड येथील संचालक डॉ. किशोर इंगळे यांना मतदानाचा अधिकार सर्वानुमते बिनविरोध देण्यात आला आहे.

ही महत्त्वपूर्ण बैठक पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. मनीष देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. डॉ. किशोर इंगळे यांच्या निवडीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती शांततेत साजरी करावी -पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती डिजेमुक्त आणि शांततेत साजरी करून पदाधिकारी व समाज बांधवांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन ग्रामीण स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केले. ग्रामीण पोलीस स्टेशन येथे आयोजित शांतता बैठक प्रसंगी ते बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण पोलीस स्टेशन येथे जयंती मंडळ पदाधिकारी व विविध विभागांचे अधिकारी यांच्या उपस्थितीत शांतता समितीची बैठक १० एप्रिल रोजी घेण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, अग्निशमन दलाचे वाघमारे, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे शिंदे, मनपाचे सिडको क्षेत्रीय कार्यालय वरिष्ठ लिपीक मोहन लांडगे, महावितरणचे सुरेंद्र वाघमारे, उपनिरीक्षक संजय केंद्रे, प्रवीण सोळंके, नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख यांच्यासह जयंती मंडळ पदाधिकारी उपस्थित होते.

चिंचोलकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी करावी व शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार लक्षात घेऊन त्या विचारांचे आचरण करावे असे सांगून आंबेडकरवादी मशिनच्यावतीने जयंतीनिमित्त १८ तास अभ्यास अभियान राबविणारे डॉ. दीपक कदम यांचे अभिनंदन केले.

यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या अनेक गावांतील व शहरी भागातील जयंती मंडळ पदाधिकारी व माजी जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब महाराज, पी. एस. गवळे, अशोक मगरे, भीमराव बेरजे, एकनाथ वाघमारे, डी. के.कांबळे, जगदीश भुरे, सम्राट आढाव, सुमनबाई पाटील, शकुंतला कापसे, गंगासागर गोडबोले यांच्यासह जयंती मंडळ पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार उपस्थित होते.

## राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनात गोविंद गोरे कनकदास समाज सेवा पुरस्काराने सन्मानित

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –सव्हाया राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलन दि.११ मार्च २६ चांदवड जि.नाशिक येथे संपन्न झाले. या अधिवेशनात गोविंद गोरे यांनी केलेल्या समाजकार्याची दखल घेऊन त्यांना कनकदास समाज सेवा पुरस्कार देण्यात आला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळयानिमित्ताने रंगमहालात होळकर वाडा आयोजित दोन दिवसीय सव्हाया राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, राज्यसभा खासदार रामराव वडकुते, आ. गोपीचंद पडळकर, आ. डॉ. राहुल आहेर, चांदवडचे नगराध्यक्ष वैभव बागुल, संयोजक बापू शिंदे, सुभाष बोंद्रे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.




यावेळी नांदेड जिल्ह्यातील व नांदेड तालुक्यातील जुना कौठा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा समाजात सामाजिक सेवेत उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन गोविंद गोरे यांना कनकदास समाजसेवा पुरस्कार सन्मान चिन्ह, देऊन सत्कार करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल नांदेड जिल्हा समाजाच्या वतीने गोविंद गोरे यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# स्वारातीम विद्यापीठामध्ये महाड सत्याग्रह शताब्दी व जयंती महोत्सव उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सप्ताहानिमित्ताने महाड सत्याग्रह शताब्दी आणि महात्मा जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव उत्साहात पार पडत आहे. शनिवार दि. ११ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात महात्मा जोतीबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे होते. मुख्यवक्ते तेलंगाना न्यूज टीव्हीचे कार्यकारी संचालक तथा वरिष्ठ पत्रकार पाशम यादगिरी हे होते. विशेष उपस्थितीमध्ये प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, हैद्राबाद येथील कस्टमचे माजी अधीक्षक महेश्वर राज, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, समन्वयक डॉ. सुनीता पाटील यांची उपस्थिती होती. दुसऱ्या सत्रामध्ये मुंबई येथील शाहीर चरण जाधव यांनी आंबेडकरी शाहिरी जलसा सादर केला.

रविवार, दि. १२ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठ परिसरातील व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये महाड सत्याग्रह शताब्दी वर्षे/समतेचा संघर्ष या विषयावर चित्रकला स्पर्धा, महात्मा जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील समता, स्वतंत्र व संविधान या विषयावर रांगोळी स्पर्धा तर महाड सत्यागृह महात्मा जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार या विषयावर वकृत्त्व स्पर्धा पार पडणार आहे. तर सोमवार, दि. १३ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठातील ज्ञान स्रोत केंद्रामध्ये १८ तास अभ्यासाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत विद्यार्थी व कर्मचारी अभ्यास करणार आहेत. मंगळवार, दि. १४ एप्रिल, २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून दि. १५ एप्रिल, २०२६ रोजी समारोप व पारितोषिक वितरण समारंभ पार पडणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांची उपस्थिती लाभणार आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनीता पाटील यांनी कळविले आहे.

जयंती महोत्सव व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, डॉ. राजेंद्र गोणारकर, काळबा हनवते, संदीप एडके, हर्षवर्धन दवणे यांच्यासह प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

# भोकरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १९ एप्रिल रोजी सांस्कृतिक कार्यक्रम

**भोकर (प्रतिनिधी)** –भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती भोकर शहरात मोठ्या उत्साहात डिजेमुक्त वातावरणात मंगळवार, दि. १४ एप्रिल रोजी मिरवणूक निघणार असून, दि. १९ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता व्याख्यान व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हयातीत संघर्ष करून वंचितांना माणूसपण मिळवून दिले. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यावर आधारित देशाला संविधान देऊन सर्वसामान्य नागरीक व महिलाांना न्याय मिळवून दिला. त्यांची जयंती हर्षोल्हासात साजरी करावी, डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या विचारांचे प्रतिबिंब जयंतीच्या माध्यमातून दिसले पाहिजे, तरुण वर्गाला दिशा मिळण्यावाठी डिजेमुक्त वातावरणात बँड ढोल ताशाच्या गजरात भोकर शहरात मंगळवार, दि. १४ एप्रिल २६ रोजीच महामानवाची जयंती मिरवणूक काढण्याचा महत्वपूर्ण निर्णय सार्वजनिक जयंती महोत्सव समितीने घेतला आहे. दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ८३० वा. सर्व वार्डातील बुध्द विहार समोर पंचशील ध्वजारोहण त्यानंतर ९.३० वाजता डॉ. आंबेडकर पुतळ्याच्या जागी जयंती मंडळाच्या अध्यक्षा सुलोचना ढोले यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण होईल. त्यानंतर त्रिशरण पंचशील बौध्द महासभेचे तानुकाध्यक्ष सुरेश जोंधळे, सचिव उतम एडके हे घेतील. दुपारी ३ वाजता महात्मा फुले नगर लुंबिनी बुध्द विहारापासून रथयात्रेसह मिरवणूक निघणार आहे.

रविवार, दि. १९ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता मोंढा मैदानात नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख वक्ते प्रा. नागराज मगरे यांचे व्याख्यान होईल. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. रविंद्र चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, आ. भीमराव केराम, तिरूपती कोंढेकर, जगदीश पाटील, नागनाथ घिसेवाड, शिवाजी पाटील किन्हाळकर, गोविंद पाटील गौड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रात्री ८.३० वा. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध महिला शाहिरा 'एक त्या रायगडावर एक त्या चवदार तळ्यावर' फेम सीमाताई पाटील आणि जालीदादा मोरे यांच्या संचाचा जागर महामानवाचा हा कार्यक्रम सादर होणार आहे. या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जयंती मंडळाच्या अध्यक्षा सुलोचना ढोले, सचिव एल. ए. हिरे, उपाध्यक्ष डॉ. मनोज गिमेकर, दिलीप राव, भीमराव दुधारे, दत्ता डोंगरे, मुकुंद धोतरे, सिद्धार्थ जाधव यांनी केले आहे.

# प्रगतीमंत्र

# UPSC देतेय मंत्रालयात नोकरीची संधी!

## नवीन भरतीसाठी सुरू झाले अर्ज, पात्रतेचे निकष पहा...




**जर सरकारी नोकरीची इच्छा असेल, तर तुम्हाला मंत्रालयात नोकरी मिळवण्याची संधी आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाने नुकतीच एक नवीन भरती जाहीर केली आहे, ज्याद्वारे सांस्कृतिक मंत्रालय, संरक्षण मंत्रालय आणि मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या विभागांमधील पदांसाठी उमेदवारांची निवड केली जाईल. या नवीन भरतीची जाहिरात आयोगाच्या अधिकृत वेबसाइट upsc.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाइन अर्ज करण्याची विंडो ११ एप्रिल २०२६ रोजी उघडली आहे.**

» अर्ज सुरू होण्याची तारीख : ११ एप्रिल २०२६
» अर्ज करण्याची अंतिम तारीख : १ मे २०२६, सायंकाळी ६ वाजता

## पदांचा तपशील

| पद | मंत्रालय | रिक्त जागा | वयोमर्यादा | वेतन |
|---|---|---|---|---|
| सहाय्यक कीपर | (भारतीय मानववंशशास्त्र सर्वेक्षण) सांस्कृतिक मंत्रालय | ०१ | ३० वर्षे | स्तर ०७ |
| वरिष्ठ स्टोअर अधिकारी ग्रेड-II | (संरक्षण संशोधन आणि विकास संस्था- DRDO, संरक्षण मंत्रालय | ०७ | ३५ वर्षे | स्तर-१० |
| पशुधन अधिकारी | (पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग) मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालय | ०८ | ३५ वर्षे | स्तर-१० |

## कोणती पात्रता आवश्यक आहे?

» सहाय्यक कीपर : मान्यताप्राप्त विद्यापीठातून मानववंशशास्त्र (Anthropology) मध्ये पदवी किंवा पदव्युत्तर पदवी. तसेच, संग्रहालयशास्त्र (museology) मध्ये डिप्लोमा असणे आवश्यक आहे. संग्रहालयातील वस्तू हाताळण्याचा आणि त्यांची देखभाल करण्याचा एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

» वरिष्ठ स्टोअर अधिकारी ग्रेड-II : अर्थशास्त्र (Economics) किंवा वाणिज्य (Commerce) किंवा सांख्यिकी (Statistics) किंवा व्यवसाय अभ्यास (Business Studies) किंवा सार्वजनिक प्रशासन (Public Administration) मध्ये पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक आहे. संबंधित क्षेत्रात दोन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

» पशुधन अधिकारी : मान्यताप्राप्त विद्यापीठातून पशुवैद्यकशास्त्र (Veterinary Science) आणि पशुपालन (Animal Husbandry) मध्ये पदवी असणे आवश्यक आहे. भारतीय राज्य पशुवैद्यक परिषदेकडे (State Veterinary Council of India) नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. उमेदवाराला पशुधन आणि पशुधन विकास (Cattle and Livestock Development) किंवा पशु आरोग्य (Animal Health) किंवा कुक्कुटपालन (Poultry) किंवा मांस आणि मांस उत्पादने (Meat and Meat Products) मध्ये तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

## UPSC भरतीसाठी अर्ज कसा करावा?

सर्वप्रथम, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) अधिकृत वेबसाइट upsc.gov.in ला भेट द्या. जर तुम्ही तुमचा नोंदणी क्रमांक तयार केला नसेल तर प्रथम तुमच्या माहितीचा वापर करून तो तयार करा. त्यानंतर तुम्ही तुमच्या नोंदणी क्रमांकाचा वापर करून वेबसाइटवर लॉग इन करू शकता. तुमचा शैक्षणिक तपशील, अनुभव, पत्ता आणि इतर वयोमर्यादा भरा. तुमच्या प्रमाणपत्रांनुसार सर्व तपशील भरा. तुमचा पासपोर्ट आकाराचा फोटो, सही आणि इतर आवश्यक कागदपत्रे योग्य आकारात अपलोड करा. तुमच्या प्रवर्गानुसार अर्ज शुल्क भरा आणि शेवटी अर्ज सादर करा. या भरतीशी संबंधित इतर कोणत्याही माहितीसाठी, उमेदवार UPSC च्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकतात.

# गाण्याची अन् वाद्य वाजवण्याची आवड असलेल्या तरुणांसाठी भारतीय नौदलात भरती

## नोंदणी सुरू, कोणतेही शुल्क नाही...

**गाण्याची आणि वाद्य वाजवण्याची आवड असलेल्या तरुणांसाठी एक विशेष भरती जाहीर करण्यात आली आहे. भारतीय नौदल संगीतात विशेष आवड असलेल्या उमेदवारांची भरती करत आहे. अविवाहित पुरुष आणि महिला अर्ज करू शकतात. भारतीय नौदलाच्या अधिकृत वेबसाइट www.joinindiannavy.gov.in वर अग्निवीर एमआर (संगीतकार) ०२/२०२६ बॅचसाठी ऑनलाइन अर्ज सुरू झाले आहेत. पात्रतेचे निकष पूर्ण करणारे इच्छुक उमेदवार अर्ज करू शकतात.**




» अर्ज सुरू होण्याची तारीख : ११ एप्रिल, २०२६
» अर्ज करण्याची अंतिम तारीख : २६ एप्रिल, २०२६
» अर्ज शुल्क भरण्याची अंतिम तारीख : २६ एप्रिल, २०२६

## महत्त्वाचा तपशील

» भरती आयोग : भारतीय नौदल

» प्रवेश: अग्निवीर एमआर (संगीतकार) - ०२/२०२६

» रिक्त जागा : अद्याप जाहीर नाहीत

» निवड प्रक्रिया : शॉर्टलिस्टिंग, शारीरिक योग्यता चाचणी, लेखी परीक्षा, संगीत अभियोग्यता चाचणी आणि वैद्यकीय चाचणी. शारीरिक योग्यता चाचणी आणि लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगीत अभियोग्यता चाचणीला देखील सामोरे जावे लागेल.

» पगार : अग्निवीरांना दरमहा ३०,००० चे वेतन पॅकेज मिळेल, ज्यामध्ये निश्चित वार्षिक वेतनवाढ असेल. हे दुसऱ्या वर्षी ३३,०००, तिसऱ्या वर्षी ३६,५०० आणि चौथ्या वर्षी ४०,००० पर्यंत वाढेल.

» शर्यत : पुरुषांनी १.६ किमीची शर्यत ६ मिनिटे ३० सेकंदांत पूर्ण करणे आवश्यक आहे. महिलांनी १.६ किमीची शर्यत ८ मिनिटांत पूर्ण करणे आवश्यक आहे. सिट-अप्स, पुश-अप्स देखील आवश्यक आहेत.

» अर्ज शुल्क : मोफत



## कोण अर्ज करू शकतो?

» शैक्षणिक पात्रता : मान्यताप्राप्त बोर्डातून मॅट्रिक (इयत्ता १० वी) किंवा समकक्ष उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

» संगीत संबंधित पात्रता : उमेदवारांना संगीताचे ज्ञान असणे आवश्यक आहे. लय, सूर आणि संपूर्ण गाणे अचूकपणे गाण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. भारतीय किंवा विदेशी बनावटीचे कोणतेही वाद्य वाजवता आले पाहिजे. वायुवाद्यावर हिंदुस्तानी किंवा कर्नाटकी शास्त्रीय संगीत सादर करणाऱ्या उमेदवारांकडे कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडून किंवा प्रतिष्ठित संस्थेकडून अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. पाश्चात्य स्वरलिपी, राष्ट्रीय किंवा पाश्चात्य वाद्ये वाजवणाऱ्या उमेदवारांकडे ट्रिनिटी कॉलेज, लंडन किंवा रॉयल स्कूल ऑफ म्युझिक, लंडन यांसारख्या आंतरराष्ट्रीय मंडळाकडून वायुवाद्यासाठी किमान श्रेणीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. इतर उमेदवारांनी विविध स्पर्धांमधील सहभागाची किंवा पुरस्कारांची प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

» वय : उमेदवारांचा जन्म १ जुलै २००४ ते ३१ डिसेंबर २००८ या दरम्यान झालेला असावा. दोन्ही तारखा ग्राह्य धरल्या जातील.

## अर्ज कसा करावा?

www.joinindiannavy.gov.in या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी. तुम्हाला प्रथम नोंदणी करावी लागेल. AMR/MR संगीतकार यावर क्लिक करा. सरकार/राज्य सरकारने जारी केलेले फोटो ओळखपत्र निवडा. फोटो ओळखपत्र क्रमांक प्रविष्ट करा. यानंतर, कॅप्चा कोड अचूकपणे भरा आणि तो सेव्ह करा. आता तुमचा मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी निवडा आणि तुमची मूलभूत माहिती भरा. नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केल्यानंतर, त्याचा वापर करून वेबसाईटवर लॉग इन करा. आता फॉर्ममध्ये विचारलेली उर्वरित माहिती काळजीपूर्वक भरा. तुमचा नवीनतम फोटो आणि सही योग्य आकारात स्कॅन करून अपलोड करा. यानंतर, अर्जाची प्रिंटआउट घ्या आणि ती सुरक्षित ठेवा. या भरतीशी संबंधित इतर कोणत्याही माहितीसाठी, उमेदवारांनी भारतीय नौदलाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी, असा सल्ला दिला जातो.

# चांगल्या नोकऱ्या सोडून, घर पणाला लावून, आता 120 कोटी रुपयांची उलाढाल, अशाप्रकारे जुळ्या भावांनी 'करून दाखवलं'!

**आलोक कौशिक आणि अनुराग कौशिक हे चंदीगडचे आहेत. या जुळ्या भावांच्या जोडीने खूप कमी वेळात एक यशस्वी स्टार्टअप उभा केला आहे. त्यांनी परदेशातील आपल्या चांगल्या नोकऱ्या सोडून २०१९ मध्ये भारतात आपला स्टार्टअप सुरू केला. त्याचे नाव 'नॅचुरल्टेन' आहे. यासाठी भावांनी आपले घरही पणाला लावले. ते शुद्ध प्रोटीन सप्लिमेंट्स विकतात. जर्मनीमध्ये काम करत असताना त्यांनी तेथील कडक गुणवत्ता मानकांचे निरीक्षण केले आणि भारतातही त्याच दर्जाचे शुद्ध प्रोटीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. आज, या स्टार्टअपची उलाढाल १२० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. आलोक कौशिक आणि अनुराग कौशिक यांच्या यशाच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊया...**





अनुराग आणि आलोक कौशिक यांचा प्रवास चंदीगडमध्ये सुरू झाला. तथापि, त्यांच्या करिअरने त्यांना पुणे आणि नंतर जर्मनीला नेले. अनुराग HCL (HCL) मध्ये प्रोजेक्ट मॅनेजमेंटमध्ये होता, तर आलोक जर्मन दिग्गज SAP मध्ये काम करत होता. २०१९ मध्ये जेव्हा त्यांनी भारतीय बाजारपेठेत प्रवेश केला, तेव्हा त्यांना प्रोटीन सप्लिमेंट्समध्ये मानके आणि पारदर्शकतेचा तीव्र अभाव आढळला. याच दूरदृष्टीने, दोन्ही भावांनी आपल्या चांगल्या नोकऱ्या सोडल्या आणि आपला स्टार्टअप सुरू करण्यासाठी घराचाही धोका पत्करला.

» गुणवत्ता आणि चाचणीवर लक्ष : जुळ्या भावांच्या स्टार्टअपची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची जर्मन गुणवत्ता आणि कठोर चाचणी. त्यांची उत्पादने कोलोन लिस्टद्वारे प्रमाणित आहेत, ज्यामुळे खेळाडूंसाठी डोपिंग-मुक्त मानकांची हमी मिळते. शिवाय, कंपनी हे सुनिश्चित करते की तिचे सप्लिमेंट्स ग्लायफोसेट (एक हानिकारक कीटकनाशक) पासून मुक्त आहेत. सुरुवातीला, उत्पादने जर्मनीमध्ये तयार केली जात होती. तथापि, २०२२ नंतर, त्यांनी भारतातील प्रमाणित थर्ड पार्टी सुविधांमध्ये उत्पादन सुरू केले.

» प्रचारासाठी हे मॉडेल स्वीकारले... : विशेष म्हणजे, १२० कोटी रुपयांची उलाढाल गाठूनही आलोक आणि अनुराग यांनी कोणतीही सशुल्क जाहिरात चालवली नाही. त्याऐवजी, त्यांनी आपली विपणन रणनीती विश्वासावर आधारित ठेवली. त्यांनी आपली उत्पादने खऱ्या अर्थाने आरोग्य-सजग असलेल्या फिटनेस इन्फ्लुएन्सर्सना देऊ केली. जेव्हा या तज्ज्ञांनी स्वतः उत्पादने वापरली आणि त्यांना ती आवडली, तेव्हा तोंडी प्रसिद्धीमुळे ब्रँडचे मूल्य वाढले. आज, कंपनीच्या ७०% पेक्षा जास्त ऑर्डर्स थेट त्यांच्या वेबसाइटवरून येतात.

» भविष्यातील मोठे लक्ष्य : आलोक आणि अनुराग यांच्या स्टार्टअपची प्रचंड वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये १२ कोटी रुपयांच्या महसुलाने सुरुवात करून, कंपनी आर्थिक वर्ष २०२५-२६ पर्यंत १२० कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ज्यामध्ये ८ कोटींचा निव्वळ नफा समाविष्ट आहे. आतापर्यंत ७००,००० हून अधिक ग्राहकांना सेवा दिल्यानंतर, हे बंधू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये २३० कोटींच्या महसुलाचे लक्ष्य ठेवत आहेत. त्यांचा विश्वास आहे की, ते उत्पादन 'विकायला' कधीच शिकले नाहीत. त्याऐवजी, ते फक्त 'योग्य उत्पादन तयार करायला' शिकले. हेच त्यांच्या यशाचे खरे रहस्य आहे.

# दृढनिश्चयाचा विजय 35 परीक्षांत अपयशी, पण तुटले नाही धैर्य, आधी आयपीएस, आता बनले आयएएस!

**काही लोक दृढ निश्चयी असतात. आयुष्यातील प्रत्येक अडचणीवर मात करून पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतात. आम्ही सांगत असलेली केवळ यशोगाथा नाही तर दुर्दम्य इच्छाशक्तीचे आश्चर्यकारक उदाहरण आहे. ३५ परीक्षांत अपयशी ठरल्यानंतरही हरियाणाचे सुपूत्र विजय वर्धन विचलित झाले नाहीत. त्यांनी दोनदा यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून आपले स्वप्न साकार केले. प्रथम, ते आयपीएस अधिकारी झाले आणि नंतर आयएएस अधिकारी बनले. त्यांची यशोगाथा परीक्षेची तयारी करणाऱ्यांना हे दाखवून देते की, अडचणींमध्येही पुढे जाण्याची जिद्द हाच खरा विजय आहे.**



विजय वर्धन हे हरियाणाच्या सिरसा जिल्ह्यातील रहिवासी आहेत. सामान्य कुटुंबातून आल्यामुळे मोठी स्वप्ने त्यांच्या डोळ्यांत होती. काहीतरी मोठे साध्य करण्याचा त्यांचा सुरुवातीपासूनच दृढनिश्चय होता. परिस्थिती कशीही असली तरी, त्यांनी आपले ध्येय कधीही नजरेआड होऊ दिले नाही. हाच विचार त्याच्या संघर्षाचा भक्कम पाया बनला.

## आधी इंजिनिअरिंग, मग सरकारी नोकरी

विजय यांनी दिल्लीतून इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. इथेच त्यांनी सरकारी नोकरीचे स्वप्न पाहिले. सुरुवातीला त्यांना वाटले की कठोर परिश्रमाने यश लवकर मिळेल, पण वास्तव खूपच कठीण होते. हळूहळू त्यांना जाणवले की संयम आणि सातत्यपूर्ण कठोर परिश्रम आवश्यक आहेत.

## परीक्षांमध्ये 35 वेळा अपयशी...

सरकारी नोकरी मिळवण्याच्या आशेने विजय यांना जवळपास ३५ स्पर्धा परीक्षांमध्ये अपयशाचा सामना करावा लागला. मात्र त्यांनी हार मानली नाही. प्रत्येक वेळी ते आपल्या चुका समजून घेत असत आणि सुधारण्यासाठी प्रयत्न करत असे. अपयश हे यशाचे सर्वात मोठे शिक्षक आहे, असा त्यांचा विश्वास होता.

## अखेर स्वप्न साकार झाले...

विजय यांनी २०१८ मध्ये यूपीएससी परीक्षेत १०४ वा अखिल भारतीय रँक मिळवला. यामुळे त्यांना आयपीएस अधिकारी होण्याची संधी मिळाली. पण त्यांचे स्वप्न तिथेच संपले नाही. त्याला आयएएस अधिकारी व्हायचे होते, म्हणून त्यांनी पुन्हा तयारी सुरू केली. सततची मेहनत आणि आत्मविश्वासाने, विजय २०२१ मध्ये पुन्हा यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले आणि या वेळी आयएएस अधिकारी बनले. त्यांचा प्रवास हे दाखवून देतो की यश केवळ प्रतिभेनेच नव्हे, तर संयम, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाने मिळवले जाते. अपयशाला घाबरणाऱ्या आणि सहज हार मानणाऱ्या प्रत्येकासाठी विजयची कहाणी एक प्रेरणा आहे.

# वारकरी संप्रदायामध्ये ६० टक्के लोक धर्मांध शक्तींना बळ देतात; शरद पवारांच्या भूमिकेनंतर फडणवीसांकडून जोरदार टीका




**मुंबई (प्रतिनिधी)** –'वारकरी संप्रदायासारख्या समतेच्या चळवळीतही प्रतिगामी लोक घुसखोरी करू लागले आहेत. वारकरी संप्रदायामध्ये ६० टक्के लोक धर्मांध शक्तींना अधिक बळ मिळेल, अशा पद्धतीने मांडणी करतात,' असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी एका लेखात मांडले. त्यावर जोरदार टीका होत आहे. 'पवार यांचे मत आणि संबंधित लेख अत्यंत चुकीचा, आक्षेपार्ह आहे,' असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी केला. इतरही अनेक नेत्यांनी पवार यांना लक्ष्य केले.

'वारकरी संप्रदायात शहरी माओवाद्यांशी संबंधित लोकांनी घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. त्यांना वारकरी संप्रदायाने झिडकारले,' असेही फडणवीस यांनी अधोरेखित केले.

'वारकरी विचारांशी संबंध नसणाऱ्या किंबहुना त्यांच्याविरुद्ध विचारांच्या मंडळींनी यात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. त्यातील काही जण शहरी माओवादी होते. याचे व्हिडिओ चित्रीकरण माझ्याकडे आहे,' असे मुख्यमंत्री म्हणाले.

'श्रद्धेच्या विषयात राजकारण न आणण्याचे पथ्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांनी काटेकोर पाळले आहे. वारकरी संप्रदायात हस्तक्षेपाचा प्रयत्न महाराष्ट्रातील महायुती सरकारने कधीही केलेला नाही. वारकरी संप्रदायाचे साहित्य संमेलन सुरू करण्याची योजना महायुती सरकारच्या विचाराधीन आहे,' असे मंत्री उदय सामंत म्हणाले.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, 'वारकरी संप्रदायात अनेक जातीचे लोक असतात. त्यामुळे त्याला जातीय बळ देणे हा प्रचार सुरू असून, हिंदू धर्माला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हिंदू समाजाच्या ताकदीत फुट पाडण्याचा प्रयत्न शरद पवार यांनी करू नये, त्यात जातीय घुसखोरी होईल, असे म्हणू नये.'

'वारकरी समाज हा विठ्ठलाला मानणारा समाज आहे. तिथे सगळे हिंदू विचारसरणीचे लोक आहेत. शरद पवार यांचा उजव्या बाजूला येण्याचा प्रयत्न होता. तिथे त्यांना घुसखोरी करता आली नाही, म्हणून ते आता डाव्या विचारसरणीचा अजेंडा बोलत आहेत. पवार यांनी वयाची मर्यादा ओळखून अशा प्रकारची वक्तव्ये करू नयेत,' असे भाजपचे आमदार परिणय फुके म्हणाले.

काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पवार यांची पाठराखण केली. 'वारकरी संप्रदाय हा पुरोगामी विचारांचा वारसा सांगणारा असून, तो मनुवादाच्या विरोधात आहे. मात्र, सध्या वारकरी संप्रदायाच्या आड राहून काही लोक प्रतिगामी विचार मांडत आहेत. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारसरणी ही स्त्री-पुरुष समानता आणि जातीवाद मानणारी आहे,' असा आरोप त्यांनी केला.

# जनगणना २०२६ च्या कार्यक्रमाची जबाबदारी अभियंत्यांच्या खांद्यावर

**मुंबई (प्रतिनिधी)** – आगामी भारतीय जनगणना २०२६ च्या कार्यक्रमा-साठी मुंबईत जनगणनेला सुरुवात झाली असून यासाठी महानगरपालिकेतील अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांवरही जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. एका बाजूला पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, रस्ते, मलनि:सारण वाहिन्या, सांडपाणी प्रक्रिया केंद्र, घनकचरा व्यवस्था आदींचे काम प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक असतानाच अशाप्रकारच्या जनगणनेच्या कामांसाठी महापालिका अभियंत्यांना जुंपवले जात असल्याने अभियंत्यांच्या संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशनच्यावतीने महापालिका आयुक्त आश्विनी भिडे ०८ एप्रिल रोजी निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनामध्ये इंजिनिअर्स असोशिएशनने असे नमुद केले आहे की, मुळातच महापालिकेतील अभियंत्यांची मोठ्या प्रमामावर पदे गेली अनेक वर्षे रिक्त आहेत. सध्या जवळपास १८० कार्यकारी अभियंत्यांची पदे रिक्त असून, त्याचप्रमाणे इतर अभियंता पदांमध्येही मोठ्या प्रमाणात तूट आहे. उपलब्ध मनुष्यबळावरच संपूर्ण मुंबई शहरातील विकासकामे, पायाभूत सुविधा, तसेच दैनंदिन देखभाल यांचा मोठा ताण आहे.

अलिकडेच महापालिका निवडणुकांमुळे काही काळ विकासकामांमध्ये खंड पडला होता. सध्या उपलब्ध अभियंते प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याशिवाय, येणाऱ्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाई, गटार सफाई, रस्ते दुरुस्ती, जल वितरण, मलनि:सारण व्यवस्था, घन कचरा व्यवस्थापन आदी अत्यंत महत्त्वाच्या कामांची जबाबदारीही अभियंत्यांवर आहे. ही सर्व कामे वेळेत व प्रभावीपणे पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

पण अशा परिस्थितीत, जनगणनेसारख्या मोठ्या आणि वेळखाऊ प्रक्रियेसाठी अभियंत्यांची नियुक्ती करणे हे प्रशासनिकदृष्ट्या योग्य ठरणार नाही, तसेच त्यामुळे शहराच्या अत्यावश्यक विकासकामांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे,असल्याचे सांगत भीती वर्तवली आहे.

असोशिएशनचे कार्याध्यक्ष रमेश भूतेकर-देशमुख यांनी या निवेदनाच्या माध्यमातून प्रशासनाला विनंती करत, भारतीय जनगणना २०२६ च्या कार्यक्रमातून महापालिका अभियंता संवर्गास पूर्णतः वगळण्यात यावे, जेणेकरून ते आपली मूलभूत जबाबदारी प्रभावीपणे पार पाडू शकेल,असे म्हटले आहे.

# अशोक खरातला विशेष तपास पथकाने केली अत्याचाराच्या तिसऱ्या गुन्ह्यात अटक

**नाशिक (प्रतिनिधी)** – महिलांवर लैंगिक अत्याचार करणारा भोंदूबाबा संशयित अशोक खरातला विशेष तपास पथकाने (एसआयटी) अत्याचाराच्या तिसऱ्या गुन्ह्यात अटक केली. खरातविरुद्ध तब्बल '१६० जीबी' पुरावे संकलित झाले असून, त्याचे तीन 'पेनड्राइव्ह' एसआयटीच्या ताब्यात आहेत. यासह खरातचे सनदी लेखापाल (सीए) ललित पोफळे यांनी खरातविरुद्ध आठ कोटी रुपये फसवणुकीबाबत लेखी तक्रार केली. सक्तवसुली संचालनालयाने खरातचे तीन बँक खाते गोठविले आहेत.



महिला अत्याचाराचे आठ गुन्हे, खंडणी, खासगी सावकारीसह फसवणुकीचे पाच व धमकावल्याचा एक असे एकूण चौदा गुन्हे नोंद असलेल्या संशयित खरातच्या कुकर्मांचा 'पेनड्राइव्ह' पोलिसांत सुपूर्द झालेल्या गुन्ह्याचा तपास आता सुरू झाला आहे. सरकारवाडा पोलिसांत अशोक खरातच्या 'ऑफिस बॉय'ने दिलेल्या फिर्यादीनुसार दाखल लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात खरातला एसआयटीने अटक केली.

खरात हा नाशिकच्या बाजारातून गावठी चिंचोके खरेदी करून नाशिकरोड येथील महेश कलंत्री या व्यावसायिकाला देत होता. त्यामुळे व्यावसायिक अडचणीत आला असून, खरातच्या कार्यालयातील 'व्हिजिटर्स बुक'चाही तपास एसआयटीने सुरू केला आहे. शहरासह इतर ठिकाणच्या बाजारातून खरात शंभर रुपये किलो दराने मिळणारे रानटी चिंचोके खरेदी करायचा. हे चिंचोके कलंत्रीकडे जायचे. व्यावसायिक चिंचोके कापडाने घासून स्वच्छ करून त्याचे महागड्या खड्यांत रूपांतर करायचा. हेच बनावट खडे खरात मंत्रून दहा हजार ते एक लाख रुपये दराने विक्री करायचा, असे फिर्यादीत नमूद आहे.

सतत पोलिसांच्या चौकशी-मुळे खरातची मानसिक स्थिती आता खालावली आहे. 'मी इथून बाहेर पडेन असे वाटत नाही, माझं मरण इथेच आहे', असे तो चौकशीदरम्यान बोलल्याचे समजते. खरातवर आतापर्यंत पंधरा गुन्हे दाखल आहेत. त्यांपैकी तिसऱ्या गुन्ह्याप्रकरणी खरात एसआयटीच्या पोलिस कोठडीत आहे. त्याने फसवणुकीसह लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्याची स्पष्टपणे कबुली दिलेली नाही. मात्र, काही मुद्द्यांवर त्याने पोलिसांना माहिती दिली असून, त्याची पत्नी कल्पना शिर्डी व सिन्नर पोलिसांच्या गुन्ह्यात पसार आहे.

# जगबुडी नदीच्या पुलावर ट्रकचा भीषण अपघात, २०० फुट खोल पडता पडता कठड्यावर तरला

**मुंबई–** गोवा महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली असून जगबुडी पुलावर कंटेनर अडकल्याने अनेकांचा जीव टांगणीला लागला होता.

जगबुडी नदीवर असलेल्या पुलावरुन २०० फुट खोल नदीत पडण्यापासून ट्रक सुदैवाने बचावला, त्यानंतर दोन क्रेनने कंटेनर बाहेर काढण्यात आला. त्यामुळे, दीड तास वाहतूक विस्कळीत झाली होती.

मुंबई-गोवा महामार्गावरील खेड तालुक्यातील भरणे नाका येथे जगबुडी नदीच्या पुलावर भीषण अपघात घडला. आज सकाळी सातच्या सुमारास गोव्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मालवाहू कंटेनरवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कंटेनर दुभाजक तोडून दोन पुलांच्या मधोमध अडकला.



या अपघातात कंटेनर अर्धा नदीच्या दिशेने झुकला होता. दैव बलवत्तर म्हणून मोठी दुर्घटना टळली, अन्यथा हा कंटेनर थेट सुमारे २०० फुट खोल जगबुडी नदीत कोसळला असता.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत दोन क्रेनच्या सहाय्याने अडकलेला कंटेनर सुरक्षित बाहेर काढला. या अपघातात कंटेनर चालक किरकोळ जखमी झाला असून त्याला उपचारासाठी हलवण्यात आले.

दरम्यान, कंटेनर काढण्याच्या कामादरम्यान मुंबई-गोवा मार्गावरील एक लेन सुमारे दीड तास बंद ठेवावी लागली होती. या पुलावरील आठवड्यातील हा दुसरा भीषण अपघात ठरला आहे.

सुदैवाने ट्रक पुलावरील कठड्यावर अडकल्याने मोठा अनर्थ टळला, या घटनेचा व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

## सॅण्डलवर धावत ५ किमी पूर्ण; कौतुकाचा वर्षाव

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरू असलेल्या पोलीस भरतीदरम्यान एका उमेदवाराची जिद्द आणि मेहनत सर्वांचे लक्ष वेधून घेत घेतले आहे सध्या सोशल मीडियावर हा व्हीडीओ तुफान व्हायरल होत असून लोकांकडून कौतुकाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

पातूर येथील नितीन कुचवरे या उमेदवाराने आर्थिक अडचणी असूनही भरती चुकू नये म्हणून चपलेवरच धावला. त्याने अवघ्या १८ मिनिटांत ५ किलोमीटरचे अंतर पूर्ण करत आपली क्षमता सिद्ध केली. नितीनची ही मेहनत पाहून SRPF कमांडंट विक्रम साळी यांना त्याचे कौतुक वाटले. त्यांनी त्याची विचारपूस केली असता त्याची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याचे समजले.

या भरती प्रक्रियेसाठी सुमारे ७५ हजार अर्ज प्राप्त झाले असून दररोज हजारो उमेदवारांची मैदानी चाचणी घेतली जात आहे. अशा मोठ्या स्पर्धेत नितीनने आपल्या जिद्दीने वेगळेपण सिद्ध केले.

# स्कूल बसचे भाडे आता सरकार ठरवणार




**मुंबई (प्रतिनिधी)–** शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित करण्यासाठी राज्य सरकारने कठोर पावले उचलली आहेत. शालेय बसच्या भाडेवाढीला चाप लावत आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरण स्कूल बसचे भाडे निश्चित करणार असून, पालकांकडून एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६' या सुधारित नियमावलीचा मसुदा गृह विभागाने प्रसिद्ध केला असून, यावर १५ दिवसांत हरकती व सूचना नोंदवण्याचे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

अनेक शाळा आणि बस कंत्राटदार पालकांकडून वर्षभराचे भाडे आगाऊ घेतात. नव्या नियमानुसार आता केवळ मासिक भाडेच आकारता येईल. तसेच, प्रत्येक शाळेत 'स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी' स्थापन करणे अनिवार्य असून, ही समिती भाडे आणि तक्रारींचे निवारण करेल. या समितीला दर तीन महिन्यांनी आपला अहवाल सादर करावा लागेल.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आता केवळ सीसीटीव्ही पुरेसे नसून, प्रत्येक बस आणि व्हॅनमध्ये जीपीएस आधारित 'व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस' आणि पॅनिक बटण बसवणे बंधनकारक असेल. वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, विद्यार्थ्यांची डिजिटल उपस्थिती आणि स्वयंचलित अलर्ट पालकांना मिळणार आहेत. बसेसमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा आणि सर्व प्रवाशांसाठी सीट बेल्ट अनिवार्य करण्यात आले आहेत. महिला परिचारिकांची सक्ती

पूर्व-प्राथमिक ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या प्रवासादरम्यान प्रत्येक बसमध्ये महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे बंधनकारक असेल. विद्यार्थ्यांची बसमध्ये चढताना आणि उतरताना वेळेसह नोंद ठेवावी लागणार आहे. तसेच, विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) मुलांसाठी प्रशिक्षित कर्मचारी आणि सुलभ प्रवेश व्यवस्थेची तरतूद मसुद्यात करण्यात आली आहे. – त्याशिवाय चालक आणि वाहकांचे पोलीस व्हेरिफिकेशन आणि वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले

आहे. हा नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत बदल न केल्यास वाहनाचा परवाना थेट रद्द होणार आहे. शिक्षण आणि परिवहन विभाग संयुक्तपणे बसेसची तपासणी करून जिल्हा समितीला अहवाल देणार आहे.

# छगन भुजबळ हेलिकॉप्टर अपघात प्रकरणाची चौकशी होणार –मुख्यमंत्री




**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरच्या अपघाती लँडिंगबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पुरंदरमध्ये मंत्री छगन भुजबळ सुरक्षित आहेत, पण पायलटचा निष्काळजीपणा उघड झाला आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, या संपूर्ण घटनेची चौकशी नक्की केली जाईल.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरच्या लँडिंगबाबत पुरंदरमध्ये एक धक्कादायक आणि तितकाच थरारक प्रकार समोर आला आहे. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त खानवडी येथे आयोजित कार्यक्रमाला जात असताना, पायलटने हेलिकॉप्टर हेलिपॅडवर न उतरवता चक्क वाहनांच्या पार्किंगमध्ये उतरवले. या प्रकारामुळे उपस्थित पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी धावपळ उडाली असून, सुदैवाने मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, क्रांतीज्योती महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी छगन भुजबळ हेलिकॉप्टरने येणार होते. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून खानवडी गावात त्यांच्या लँडिंगसाठी सर्व निकष पाळून सुरक्षित ठिकाणी हेलिपॅड तयार केले होते.

हेलिकॉप्टर खानवडीच्या आकाशात पोहोचल्यानंतर पायलटने खाली जागा शोधण्यास सुरुवात केली. यावेळी त्याला कार पार्किंगची मोकळी जागा दिसली. पायलटने त्या जागेलाच हेलिपॅड समजले आणि थेट पार्किंगच्या दिशेने हेलिकॉप्टर खाली घेण्यास सुरुवात केली. गाड्यांच्या पार्किंगमध्ये हेलिकॉप्टर उतरत असल्याचे पाहताच तिथे तैनात पोलिसांनी धावत जाऊन परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला.

गाड्यांच्या पार्किंगमध्ये हेलिकॉप्टरचे चाक टेकताच पोलिसांनी तात्काळ पायलटशी संपर्क साधून ही जागा अधिकृत हेलिपॅड नसल्याचे ओरडून सांगितले. आपली चूक लक्षात आल्यावर पायलटने तात्काळ पुन्हा इंजिनचा जोर वाढवला आणि हेलिकॉप्टर हवेत झेपावले. त्यानंतर, काही अंतरावर असलेल्या नियोजित आणि सुरक्षित हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्यात आले. या सर्व प्रकारात कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नसले तरी, काही काळ परिसरात प्रचंड गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# शेतकऱ्यांना आता प्रत्येक हंगामात १०० टक्के पीक नोंदणी बंधनकारक

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात राबविण्यात येत असलेल्या 'ई-पीक पाहणी' प्रकल्पाला अधिक गती देण्यासाठी आणि त्यात पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. केंद्र सरकारच्या 'ॲग्रीस्टॅक' संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महसूल व वन विभागाने शुक्रवारी एक सविस्तर शासन परिपत्रक निर्गमित केले असून, यात जिल्हाधिकाऱ्यांपासून ते तलाठ्यांपर्यंत सर्वांच्या जबाबदाऱ्यांची निश्चिती केली आहे. विशेष म्हणजे, आता प्रत्येक हंगामात १०० टक्के पीक नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



जिल्हा स्तरावर या संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची असेल. गावांमधील खरीप आणि रब्बी पिकांची वर्गवारी करण्याचे अधिकार त्यांना देण्यात आले आहेत. प्रत्येक गावासाठी तहसीलदारांमार्फत एका 'पीक पाहणी सहायका'ची नेमणूक केली जाणार असून, या सहायकाने केलेल्या नोंदींची १०० टक्के पडताळणी करण्याची जबाबदारी संबंधित तलाठ्याकडे (ग्राम महसूल अधिकारी) सोपवण्यात आली आहे.

शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशासनाने आता आधुनिकतेची कास धरली आहे. केवळ आकाशवाणी किंवा स्थानिक वृत्तवाहिन्यांवर अवलंबून न राहता फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सप आणि विशेषतः 'रील्स'च्या माध्यमातून 'ई-पीक पाहणी'चे महत्त्व पटवून दिले जाणार आहे. इतकेच नव्हे, तर शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून थेट शेतकरी कुटुंबांपर्यंत पोहोचण्याची रणनीतीही आखण्यात आली आहे.

या प्रकल्पाचे तांत्रिक नेतृत्व पुण्यातील जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख कार्यालयाकडे सोपवण्यात आले आहे. मोबाईल प्लिकेशनची कार्यक्षमता, माहितीची सुरक्षा, गोपनीयता आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण या बाबींची जबाबदारी या कार्यालयाची असेल. तसेच, कृषी आयुक्तालयांतर्गत स्थापन झालेल्या 'ॲग्रीस्टॅक संचालनालया'मार्फत राज्यभरातील प्रगतीचा आढावा घेतला जाईल. एमआयएस डॅशबोर्डच्या मदतीने ज्या तालुक्यांमध्ये काम संथ आहे, तिथे विशेष मोहिमा राबवल्या जातील.


## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार सविता माधव शिंगेवाड, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. बरबडा, ता. नायगांव खै. जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधीतास सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौजे बरबडा, ता. नायगांव खै. जि. नांदेड येथील शेत जमीन स.नं./गट नं. ९९६ क्षे. ०० हे. ४६ आर व पोट खराब क्षेत्रफळ ०० हे. ०४ आर असून ज्याची चर्तु:सिमा पुर्वेस : शंकर मुंडकर यांचे शेत, पश्चिमेस : शंकर मुंडकर यांचे शेत, दक्षिणेस : सुलोचना मुंडकर यांचे शेत, उत्तरेस : शिवानंद मुंडकर यांचे शेतजमीन सौदाचिठ्ठी आधारे विक्री करण्याचा करार केला असून सदर करारापोटी माझ्या पक्षकाराने समोरील व्यक्तीला बयाना म्हणून काही रक्कम दिलेली आहे व माझे पक्षकार लवकरच खरेदीखत करून घेणार आहेत. तरी सर्व जनतेस व संबंधितास सुचित करण्यात येते की, सदरील व्यवहारातील मालमत्ते बाबत कोणी खरेदी विक्री, मालमत्ता हस्तांतरण, भाडे, गहाणखत किंवा भेट अशा स्वरुपाचे कोणतेही व्यवहार करुन नयेत तसे केल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधितावर राहील व त्यांना कायदेशिर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल याची नोंद घ्यावी.सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत
ॲड. नागनाथ बुध्दलवाड,
(गागलेगावकर)
जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड
मो.नं. ९४२३६९२४१२

जाहीर प्रगटन देणार
सविता माधव शिंगेवाड,
रा. बरबडा, ता. नायगांव खै.
जि. नांदेड

## Change In Name

My Old Name is **HINA PARVEEN SHAIKH ANWAR HUSAIN** which now I am changing as New Name **HEENA PARVEEN ABDUL GAFFAR.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - R/o. H.No. 1-7-910-3, Peer Nagar, Nanded 431605**
**Mo.No. 9860084336**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात
गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




# नांदेडच्या भूमीत घुमलेली स्वरसम्राज्ञीची मैफल : आठवणींने अनेकांना दाटून आले

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय संगीतविश्वावर आपल्या चिरतरुण आवाजाची मोहोर उमटवणाऱ्या महान गायिका आशा भोसले यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला आहे. जवळपास आठ दशकांहून अधिक काळ आपल्या मधुर आणि बहुरंगी आवाजाने जगभरातील रसिकांना भुरळ घालणाऱ्या या स्वरसम्राज्ञींच्या आठवणी आज सर्वांच्या मनात दाटून आल्या आहेत.



नांदेडच्या पवित्र भूमीवर झालेल्या त्यांच्या अविस्मरणीय भेटीची आठवणही या निमित्ताने पुन्हा उजळून निघत आहे. नांदेड येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेज अभिनव भारत शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त श्री गुरुगोविंदसिंघ स्टेडियम येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संगीतविश्वातील मान्यवर कलाकार आणि हजारो रसिकांची उपस्थिती लाभली होती. या सोहळ्यात संस्थेचे संचालक बाळासाहेब पांडे यांच्या हस्ते सुप्रसिद्ध संगीतकार हृदयनाथ मंगेशकर आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचा सत्कार करण्यात आला होता. त्यानंतर आशा भोसले यांनी आपल्या रसिकांच्या आवडीची अनेक गाणी सादर करत गुरु गोबिंदसिंग स्टेडियमवर अविस्मरणीय स्वरमैफल रंगवली होती. त्यांच्या मधुर आवाजाने संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि उत्स्फुर्त प्रतिसादात त्या मैफलीचा आनंद घेतला.

आज वयाच्या ९२ व्या वर्षी या महान गायिकेची प्राणज्योत मालवली असली, तरी त्यांच्या गाण्यांचा सुवास आणि त्यांच्या स्वरांची जादू सदैव जिवंत राहणार आहे. आपल्या चिरतरुण आवाजाने संपूर्ण जगाला मंत्रमुग्ध करणाऱ्या या महान कलावंताला छायाचित्रकार विजय होकर्णे यांनी या छायाचित्राच्या माध्यमातून आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत नांदेडमधील त्या अविस्मरणीय भेटी ताज्या केल्या आहेत.

## शेतकरी बाबाराव जाधव यांचा सर्पदंशाने मृत्यू



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** नांदेड तालुक्यातील बाभूळगाव येथील शेतकरी बाबाराव विश्वनाथ जाधव वय ३५ वर्षे हे आपल्या शेतात ९ एप्रिल रोजी रात्री पाणी देत असताना अचानक विषारी साप चावल्याने त्यांना शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

नांदेड तालुक्यातील बाभूळगाव येथील शेतकरी बाबाराव विश्वनाथ जाधव हे आपल्या शेतात रात्री पाणी देण्यासाठी गेले असता त्यांना सापाने दंश केला. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचे ११ एप्रिल रोजी रात्री निधन झाले. त्यांच्या निधनामुळे गावात हळहळ व्यक्त होत असून, माजी पंचायत समिती सदस्य दाजीबा राठोड यांचे ते नात जावई आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार असून, १२ एप्रिल रोजी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. बाबाराव जाधव यांच्या अपघाती निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले आहे.

## जिल्हा परिषदेत फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर

### १४ रोजी अभिवादन व विविध कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्हा परिषद नांदेड येथे महात्मा जोतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अंतर्गत सोमवार दि. १३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तर मंगळवार, दि. १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जिल्हा परिषद परिसरातून बँड वाजत-गाजत मिरवणूक काढून अभिवादन करण्यात येणार आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, दत्तात्रय गिरी, प्रशांत थोरात, मयूर आंदेलवाड, अमित राठोड, कार्यकारी अभियंता संजय शिंदे, राहुल भोजराज, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सखाराम खुणे, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माधव सलगर, दिलीपकुमार बनसोडे, कृषी अधिकारी नीलकुमार ऐतवडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याच दिवशी सकाळी १०.३० वाजता जिल्हा परिषद परिसरात अन्नदान व पाणी वाटपाचा कार्यक्रम होणार असून, सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनाचा मुख्य कार्यक्रम पार पडणार आहे. त्यानंतर गीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

तरी या कार्यक्रमास अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयुक्त जयंती महोत्सवाचे अध्यक्ष रणजीत गजभारे, सचिव राजेश जोंधळे, कार्याध्यक्ष धनंजय गुम्मलवार, कोषाध्यक्ष विजय वाघमारे, सहसचिव राघवेंद्र मदनूरकर, बालाजी नागमवाड, अशोक मोकले, प्रसिद्धी प्रमुख मिलिंद व्यवहारे, जितेंद्र तोटलवार, उज्वला गजभारे, स्वाती जोंधळे, कीर्ती मिवळे, बालाजी टोके, सुनील कदम, दीपक महालिंगे, नंदलाल लोकडे, गणेश आंबेकर आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# डॉ. बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनचे पुरस्कार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी) –** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती-निमित्ताने मागील २४ वर्षांपासून डॉ. बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने पत्रकारिता क्षेत्र तसेच सामाजिक, राजकीय शिक्षण, सांस्कृतिक, साहित्य, सहकार, आरोग्य या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. या वर्षाच्या पुरस्काराची घोषणा फाऊंडेशनचे सचिव आकाश गजभारे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केली.

सन २०२५-२६ चे पुरस्कारात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक ज्येष्ठ कवी डॉ. लक्ष्मीकांत तांबोळी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख २५००० आणि मानपत्र असणार आहे. तसेच पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना संस्थेच्या वतीने मागील २४ वर्षापासून सन्मानित करण्यात येत आहे. या वर्षाच्या राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी इलेक्ट्रॉनिक मीडिया ए.बी.पी. माझाचे पत्रकार मिक्की घई यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख २५००० आणि मानपत्र आहे. जिल्हास्तरीय पुरस्कारामध्ये मुक्तेश्वर पाटील, डॉ. मनोज गिमेकर, छायाचित्र पुरस्कार विजय होकर्णे यांचा समावेश आहे. या पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी १० हजार रुपये रोख, मानपत्र असे आहे. स्मृतिशेष मनोज गजभारे यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी यंदाचा 'प्रज्ञावंत विद्यार्थी, पुरस्कार' यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थी अतुल अनिल राजूरकर यांना जाहीर करण्यात आला आहे.

पुढील वर्षी अर्थात २०२७ साली पुरस्काराच्या उपक्रमाला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. मागील पंचवीस वर्षांमध्ये ज्या ज्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविले आहे त्या सर्वांचा यथोचित गौरव मानपत्र देऊन रौप्य महोत्सवी कार्यक्रमात करण्यात येणार आहे.तसेच सर्वांच्या स्मरणात राहील अशी एक स्मरणिका पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याचा संस्थेचा मानस असल्याचे सांगण्यात आले. गेल्या पंचवीस वर्षात ज्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव झाला आहे. त्यांचा जीवनपट आणि या स्मरणिकेच्या माध्यमातून जनतेसमोर आणणार असून, रौप्य महोत्सवी कार्यक्रमाची तयारी संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या पद्धतीचे नियोजन करून आणि त्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात येणार असल्याचेही या पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आले.

# पहिल्या दिवशी परिक्षेत्रात १.१७ लाखांचा गुटखा, ५७ हजार रुपयांचे शस्त्र जप्त

नांदेड (प्रतिनिधी)- आगामी सण, उत्सव व कायदा सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर दिनांक ११ ते २५ एप्रिल दरम्यान, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी परिक्षेत्रात गुटखा, अंमली पदार्थ व घातकशस्त्र विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे. याबाबतच्या सविस्तर सूचना, दिनांक १० एप्रिल रोजी परिक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या मोहिमेच्या पहिल्या दिवशी परिक्षेत्रात १.१७ लाखांचा गुटखा, ५७ हजारांच्या तलवारी व खंजर जप्त करण्यात आले.

नांदेड परिक्षेत्रात गुटखा विक्री करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये एकूण २ गुन्हे दाखल करुन, त्यांच्याकडून १ लाख १७ हजार ६४२ रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमूद प्रकरणात गुटखा विक्री करणाऱ्या २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

परिक्षेत्रात घातक शस्त्रांविरोधात राबविण्यात आलेल्या कारवाईत शस्त्र अधिनियमांतर्गत एकूण ११ गुन्हे दाखल करुन, आरोपींकडून ५७ हजार ८२२ रुपये किंमतीच्या तलवारी व खंजर जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. परिक्षेत्रात गुटखा,



अंमली पदार्थ व घातक शस्त्रांच्या अनुषंगाने विशेष मोहीम राबविण्यात येत असून, गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थाची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये, अंमली पदार्थाच्या विषयी एनडीपीएस कायद्यान्वये व घातक शस्त्रांच्या विषयी शस्त्र अधिनियम ान्वये कारवाई करण्यात येत आहे.

## 'कोलाज भावनांचा' कवितासंग्रहास राष्ट्रसंत गाडगे बाबा पुरस्कार जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी) –** संवेदनशील कवयित्री रुचिरा बेटकर यांच्या कोलाज भावनांचा या कवितासंग्रहाला शिर्डी येथील डेबूजी फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणारा राष्ट्रीय राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा साहित्य पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे.

'कोलाज भावनांचा' हा रुचिरा बेटकर यांचा पहिलाच कवितासंग्रह असून, मानवी मनातील भावनांचा कोलाहल त्यांनी या कवितासंग्रहातून साकारल्या आहेत. त्यांच्या या कवितासंग्रहाची डेबुजी फाउंडेशनच्यावतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा साहित्य पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे. शिर्डी येथे २६ एप्रिल रोजी पार पडणाऱ्या २८ व्या राष्ट्रसंत गाडगे महाराज साहित्य संमेलनात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल साहित्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रुचिरा बेटकर यांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्हा पोलीस दलाकडून 'मासरेड'; ६५ आरोपींवर कारवाई, २.३२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –**जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती, अवैध जुगार खेळणारे व अवैध गुटखा बाळगणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी जिल्हा पोलीस दलाच्या वतीने मासरेड टाकण्यात आली. त्यात ६५ आरोपींवर कारवाई करून २ लाख ३२ हजार ६६२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पूर्णतः बंद करण्याच्या उद्देशाने जिल्हाभरात पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ११ एप्रिल रोजी मास रेड टाकण्यात आली. या मास रेडमध्ये अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली भोकरच्या अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, प्रशांत शिंदे, शाम पानेगावकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, परमेश्वर कदम, राजेश पुरी, रामदास



शेंडगे, ओमकांत चिंचोलकर, रामेश्वर खनाळ, संतोष तांबे, एपीआय भागवत नागरगोजे, रवी वाहुळे, संतोष जोंधळे यांच्यासह पोलीस अंमलदार यांनी या मासरेडमध्ये सहभाग नोंदविला होता. या मासरेड दरम्यान अवैध दारू, हातभट्टी दारु, जुगार खेळणारे व अवैध गुटखा बाळगणाऱ्या गुन्हेगारांच्या ठिकाणांवर छापा टाकून ६० गुन्हे दाखल करण्यात आले. यावेळी ६५ आरोपींवर कारवाई करून २ लाख ३२ हजार ६६२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान शहरात ६ एप्रिलपासून कोबिंग ऑपरेशन दरम्यान नाकाबंदी करण्यात येत आहे. या कोबिंग ऑपरेशनमध्ये सराईत गुन्हेगारांची रात्री तपासणी करण्यात येते. तडीपार गुन्हेगारांची तपासणी करण्यात येऊन जर ते जिल्ह्यात आढळले तर त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात येतो. नाकाबंदी करण्यात येत असल्यामुळे विविध गुन्ह्यातील आरोपी तसेच गुन्हा करण्याच्या तयारीत असलेले गुन्हेगार या सापळ्यात सापडतात. ६ एप्रिलपासून सुरू करण्यात आलेल्या कोंबिंग ऑपरेशनमध्ये ११ एप्रिलपर्यंत ९७ गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्यावर भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## शरद करपे यांचे निधन



**कुंडलवाडी (प्रतिनिधी) –** येथील रहिवासी शरद श्रीकांत करपे यांचे रविवार, दि. १२ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दिनांक १३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता नागणी रोड स्मशानभूमी येथे होणार अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, आई, वडील, भाऊ असा परिवार आहे.

# मराठा सेवा संघाचा 'शिवकुटुंब मेळावा' हर्षोल्हासात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी) –**मराठा सेवा संघाचे संस्थापक इंजि पुरुषोत्तम खेडेकर यांच्या संकल्पनेतून शिवकुटुंब मेळावा हा नावीन्यपूर्ण उपक्रम मराठा सेवा संघाच्यावतीने देशभर राबविण्यात येत आहे. प्रतिइतिहासकार चंद्रशेखर शिखरे व शिवास्त्रकार शिवाजीराजे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मराठा सेवा संघ नांदेड शाखेने हॉटेल ताज पाटील येथे आयोजित केलेला शिवकुटुंब मेळावा हर्षोल्लासात पार पडला.

शिवकुटुंब मेळाव्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. पंजाबराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी इंजि. शे. रा. पाटील, मधुकरराव देशमुख, इंजि. व्ही. टी. शिंदे, वसंतराव इंगोले, नामदेव कुटे, नानाराव कल्याणकर, उद्धव सूर्यवंशी, कल्पना चव्हाण, सुमित्रा वडजकर, सुरेखा रावणगावकर या मान्यवरांच्या उपस्थिती होती. मराठा सेवासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन



करुन शिवकुटुंब मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रास्ताविक अॅड. सतीशकुमार जाधव, स्वागतपर मनोगत पंडित कदम यांनी व्यक्त कले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. गजानन इंगोले यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार राम डाकोरे यांनी मानले.

यावेळी सुप्रसिद्ध इतिहासकार इंजि. चंद्रशेखर शिखरे व इंटरनॅशनल माईंड पॉवर ट्रेनर शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी उपस्थित परिवारांशी अभ्यासपूर्ण संवाद साधला. चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी शिस्त, संवाद, समन्वय व सातत्य आवश्यक असल्याचे इंजि. चंद्रशेखर शिखरे यांनी सांगितले तर शिवाजीराजे पाटील म्हणाले की, एकमेकांविषयी बोलण्यापेक्षा आपण एकमेकांशी बोललो तर गैरसमजामुळे निर्माण होणारे असंख्य प्रश्न सहजपणे सुटू शकतात. जिथे जाऊ तिथे ऊर्जा, उत्साह व आनंद वाटू हा आपल्या जीवनाचा सिंपल फंडा बनविण्याचे आवाहन शिवाजीराजे पाटील यांनी केले.

या मेळाव्याला तेहतीस कक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी सहभागी कुटुंबातील सदस्यांनी परिवार सुसंवाद व कुटुंबसंसद या विशेष सत्रात आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. कधीही स्टेजवर माईक समोर न बोललेल्यांना बोलतं करण्यात आलेले यश हे या सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परमेश्वर पाटील, प्रा अशोक खुडे, सुरज पाटील, शिवाजी पाटील, महानंदा कदम, बालाजी सिरसाठ, प्रा. डॉ. सत्यभामा जाधव, राणी दळवी, प्रा. दगडू भरकड, सुनिता कल्याणकर, प्रा. प्रतिभा खुडे यांनी परिश्रम घेतले.

# महात्मा जोतीबा फुले यांची जयंती अर्धापुरात ठिकठिकाणी साजरी



**अर्धापूर (प्रतिनिधी) –**शहरात महात्मा जोतीबा फुले यांची जयंती प्रज्ञा बौद्ध विहार, संत सावता महाराज मंदिर, नगरपंचायत कार्यालय यांसह विविध ठिकाणी शनिवार, दि.११ एप्रिल रोजी साजरी करण्यात आली.

थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा जोतीबा फुले यांना जयंतीदिनी प्रज्ञा बौद्ध विहार येथे नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनिल वानखेडे, माजी उपनगराध्यक्ष राजू शेट्टे, भाजप शहराध्यक्ष योगेश हाळदे, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सखाराम क्षीरसागर, अध्यक्ष गुणवंत विरकर, व्यंकटी राऊत, नामदेव सरोदे, मुस्वीर खतीब, माजी उपसरपंच भुजंगराव माटे, अॅड भानुदास मगरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुतळ्याचे पूजन करून हार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भीमराव सरोदे, बालाजीराव सिनगारे, गुरूराज रणखांब, ज्ञानेश्वर माटे, बाळू माटे, शेख मकसुद, महिंद्र सरोदे, शेरू पठाण, गोपाल पंडित, प्रसिद्धी प्रमुख गुणवंत सरोदे, अॅड. गौरव सरोदे, बापूजी राऊत, विष्णू राऊत, प्रकाश इंगळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

संत सावता महाराज मंदिर, भाजप कार्यालय, नगरपंचायत कार्यालय यांसह ठिकठिकाणी महात्मा जोतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com